# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०१/११/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सोमवार दिनांक ०१/११/२००४ रोजी सभा सुचना क्र. १७ दि. २५/१०/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सदस्य |
| ३) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| ४) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ५) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ६) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ७) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| ८) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ९) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १०) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ११) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १२) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |

### रजेचे अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मिलन गोंविंदराव पाटील | सदस्य |

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आज या ठिकाणी स्थायी समिती सभापतींच्या निवडणुकीनंतरच्या ह्या पहिल्याच सभेचे आयोजन करण्यांत आलेले आहे आणि महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या वतीने नवनिर्वाचित सभापती ह्यांचे मी स्वागत करतो आणि भविष्यामध्ये महानगरपालिका प्रशासनाकडून त्यांना पुर्णपणे सहकार्य लाभेल अशी मी खात्री देतो.

**मा. सभापती :-**

आजची सभा सुरु करण्यापुर्वी सर्व अधिका-यांचे या ठिकाणी मी स्वागत करतो. आपले जे स्थायी समितीचे सर्व सन्मा. सदस्य आहेत त्या सदस्यांना दिवाळीच्या अगोदरच दिवाळीच्या हार्दीक शुभेच्छा देऊ इच्छितो आणि संपूर्ण शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून आपल्या सर्व सन्मा. सदस्यांना ह्या शहरासाठी काम करत असतांना ब-याचशा गोष्टींना आपल्याला तोंड द्यावे लागते. अधिका-यांच्या बरोबर, सर्वसामान्य जनतेच्या बरोबर आणि सर्वांचा सलोखा ठेवून आपण आपले प्रश्न उपस्थित करुन आपण अधिका-यांच्या बरोबर सुसंवाद साधून मिरा भाईंदरच्या विकासाला आपण चांगला हातभार लावू शकाल अशी मी सन्मा. सदस्यांकडून अपेक्षा बाळगतो आणि त्यांना हार्दिक शुभेच्या देवून अधिका-यांनाही जे काय आपले प्रश्न मांडायचे असतील ते प्रश्न मांडत असतांना आपण या शहराचा विकास करण्याच्या दृष्टीकोनातून सन्मा. सदस्यांच्या आलेल्या सुचनांवर योग्य ते त्यांना उत्तर देवून

त्यांच्याशी सुसंवाद साधुन आपण या विकास कामाला चांगला हातभार लावाल अशी अपेक्षा आपल्याकडून करतो आणि आजच्या ह्या स्थायी समितीच्या सभेला आपण सुरुवात करा असे सचिव साहेबांना सांगू इच्छितो. धन्यवाद.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९४ चे वाचन केले.)

(मा. सभापती सो. ह्यांनी ठराव क्र. ९० चे सभागृहात वाचन केले.)

**रिटा शाह :-**

ह्याच्यामध्ये श्री. संपतराव शिंदे साहेबांचा खुलासा आला काय?

**सुर्यकांत भोईर :-**

विठोबा देवालय ट्रस्ट संदर्भात या दोन महिन्यामध्ये काय झाले? त्याची प्रगती काय झाली? त्याच्याबद्दल आपण खुलासा करणार का? व कोणावर कारवाई केली? व ती झाली नसेल तर ती झाली पाहिजे. कारण माजी मुख्याधिकारी संपतराव शिंदे साहेब यांचा खुलासा प्राप्त झाला का?

**मा. सभापती :-**

आपल्याला ह्याचे उत्तर देण्या अगोदर विधी सल्लागार जे आपले आहेत ते आता सभेत उपस्थित आहेत का?

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, विधी सल्लागार आहेत किंवा नाही आहेत तो महत्वाचा प्रश्न नाही आहे. अन्यथा आम्ही इतिवृत्तांताला मंजुरी देणार नाही. कारण आपण ठराव करतांना आपण स्वतः ठराव केलेला आहे आणि त्याच्यात आम्ही विधी सल्लागाराने काय केले आणि काय केले नाही ते विचारले नाही. फक्त आम्ही एकच प्रश्न विचारला आहे की, श्री. संपतराव शिंदे ह्यांचा खुलासा आला की नाही? त्याला विधी सल्लागारांशी काही देणे-घेणे नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या रिटा शाहजी मी विधी सल्लागार आले का? हे आपल्या प्रश्नाला उत्तर देत नाही. मी विधी सल्लागार आलेत किंवा नाही ह्याच्याबद्दल अधिकाऱ्यांकडे विचारणा करतोय आणि जेव्हा मी अधिकाऱ्यांना विचारतोय त्यावर सन्मा. सदस्यांनी कृपया माझ्या त्या रुलिंगवर बोलू नये.

**सुर्यकांत भोईर :-**

आम्हांला जे प्रश्न विचारायचे आहेत ते प्रश्न विचारु ना?

**मा. सभापती :-**

तुम्हांला जे प्रश्न विचारायचे आहेत ते प्रश्न आपण विचारा. पण जेव्हा मी विचारेन तेव्हा तुम्ही विचारु नका. मी काय बोललो, विधी सल्लागार कुठे आहेत असे मी अधिकाऱ्यांना विचारणा केली. जेव्हा मी एखाद्या अधिकाऱ्याला विचारतो तेव्हा कृपया सन्मा. सदस्यांनी वेगळा अर्थ काढू नये व त्या ह्याच्यात बोलू नये. याबाबत त्यांचे जे उत्तर आलेले आहे की, सन्मा. तत्कालीन मुख्याधिकारी श्री. संपतराव शिंदेजी ह्यांचे ते उत्तर आम्हांला येथे बघायला मिळेल का? मला बोलायचे कारण असे होते की, जेव्हा हा विषय असतो तेव्हा ह्या विषयाशी निगडित विधी सल्लागार असायला पाहिजे आणि सन्मा. सदस्य जे आपण विचारले की, श्री. संपतराव शिंदे ह्यांचे उत्तर या ठिकाणी आलेले आहे आणि ती जी फाईल आहे ती फाईल विधी सल्लागार ह्यांचेकडे आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

ते तुम्ही सभागृहामध्ये आम्हांस सदस्यांना दाखवाल का?

**रिटा शाह :-**

हा ठराव सोडून आम्ही बाकीच्या इतिवृत्तांताला मंजुरी देत आहोत. ह्या विठोबा देवालय ट्रस्टच्या ठरावाला आम्ही मंजुरी देणार नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

ह्या ठरावाला आम्हीही मंजुरी देणार नाही.

**मा. सभापती :-**

ठराव क्र. ९० आहे तो आपण पेंन्डींग ठेवून पुढच्या प्रोसिडींगला सुरुवात करावी.

**रिटा शाह :-**

आपल्या परवानगीने विचारायचे आहे की, प्रोसिडींगमध्ये आपण जो ठराव मंजुर करुन देतो कामाबाबत तर त्याच्याबद्दल आता विचारण्याचे अधिकार आहेत किंवा नाही?

**मा. सभापती :-**

प्रोसिडींगमध्ये ज्या ग्रॅमेटिकल चुका असतील तर.

**रिटा शाह :-**

प्रोसिडींगमधल्या चुकांबद्दल मला विचारायचे नाही. तर आम्ही जे काम आपल्याला सुचवले ते काम सुरु का झाले नाही? त्याच्यामध्ये काय अडचणी आहेत? ते आम्ही विचारु शकतो की नाही?

**मा. सभापती :-**

ते आपण प्रोसिडींग नंतर आणि विषयपत्रिकेवरील विषय झाल्यानंतर आपण विचारु शकता आणि आता ज्या ग्रॅमेटिकल चुका असतील त्या चुका आपण सुधारुन घ्या आणि जेव्हा आपल्याला प्रोसिडींगबाबत बोलायचे असेल तेव्हा हा विषय संपल्यानंतर आम्ही आपल्याला बोलायला देवू.

**रिटा शाह :-**

इम्प्लिमेंन्टेशन ऑफ वर्क, आम्ही जो कामाचा ठराव करुन दिला आहे. त्याचे ते काम सुरु का झाले नाही? आणि झाले आहे तर कुठपर्यंत झाले आहे? त्याबद्दलची विचारपूस आम्ही केव्हा करायची?

**मा. सभापती :-**

सभेचे विषय झाल्यानंतर. आपण आपले विषय नोट करुन ठेवा. त्या विषयावर आपल्याला बोलायला देऊ.

**प्रभात पाटील :-**

अनुक्रमाने तो ठराव येईल का नाही?

**मा. सभापती :-**

तो आल्यानंतर आपणाला त्याच्यावर चर्चा करायला देतो.

**रिटा शाह :-**

ठिक आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

दि. २१/०८/२००४ रोजीच्या इतिवृत्तांतात पान क्र. ४ वर जे अखत्यारिवर आहे ते अधिकारावर आहे. पान क्र. ७ वर २९/०७/२००४ च्या इतिवत्तांतात हे सगळे आम्ही जाणतो. आत्तापण उत्तनला पाण्यावाचून वंचित ठेवले. ह्याला कारण आम्ही फक्त ठराव पास केला नाही असे नाही तर नाही जे आले आहे ते चुकीने आले आहे. नाही हे खोडून टाका आणि ह्याला कारण राजकारण असा शब्द आहे व आकस म्हणून काम केले नाही. हे काय लिहिले आहे ते मला देखील कळत नाही. ते वाक्य असे आहे की, मी त्याला दुरुस्ती सुचविली होती तरीही राष्ट्रवादी कॉंग्रेसने आणि कॉंग्रेसने राजकारण केले. हे चुकीने आले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसने आणि कॉंग्रेसने पाठिंबा दिला ह्याच्यात वारंवार दुरुस्ती करुन तरीही असेच येते ह्याला कारण काय? असे कसे होते?

**गजानन भोईर :-**

सभापतींच्या परवानगीने बोलतोय. सचिव साहेब, मागच्या वेळेस घोन्सालवीसजी ह्यांनी तुम्हांला त्याची कल्पना दिली होती की, ह्याला राष्ट्रवादीचा विरोध आहे आणि तुम्ही सांगितले की, पुढच्या वेळी सुधारणा करुन कॉपी देऊ. पण आता प्रिन्टींग चुक आहे किंवा जाणूनबुजून केले आहे. काय केले, कशासाठी केले ह्याचे आपण आम्हांला उत्तर द्या. ते दोन-दोन वेळा आले.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ते दोन वाक्य आहे. एक वाक्य असे आहे की, हे सगळे आम्ही जाणतो. पण तरीही आतापर्यंत उत्तनला पाण्यापासून वंचित ठेवले ह्याला कारण फक्त आम्ही ठराव पास केला आणि राजकारण. तुम्ही आकस म्हणून अजूनपर्यंत काम केले नाही, हे वाक्य आहे.

**गजानन भोईर :-**

पण येथे वाक्याचा काही बोधच होत नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

दुसरे वाक्य असे आहे की, संपूर्ण राष्ट्रवादी कॉंग्रेसने त्यावेळेला ठरावाला विरोध केला होता आणि कॉंग्रेसने ह्या ठरावाला पाठिंबा दिला. तो ठराव पास झाला म्हणून आम्ही उत्तनचे नागरिक कॉंग्रेसवाल्यांचे आभारी आहोत, राष्ट्रवादीचे नाही.

**प्र. सचिव :-**

ह्याच्यात कॉंग्रेसचे ऋणी राहतील असे वाक्य आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

कुठे आहे? ते नाही आले आहे.

**मा. सभापती :-**

ह्याच्यात राष्ट्रवादी काँग्रेस पाठिंबा न दिला व ठराव मंजुर झाला आणि उत्तनचे नागरिक काँग्रेसचे ऋणी राहतील हे वाक्य आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

कुठे आहे ते आपण बघा.

**मा. सभापती :-**

शेवटी दिले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

शेवटचेच मी सांगतो. राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसने ह्या ठरावाला पाठिंबा दिला व ठराव मंजुर झाला हे नाहीच आहे. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसने पाठिंबा दिलाच नाही.

**गजानन भोईर :-**

त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसने विरोध केला होता.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्यावर मग तुम्ही मतदान घेतले. पाठिंबा कुठे दिला?

**गजानन भोईर :-**

राष्ट्रवादी काँग्रेसने विरोध केला होता आणि काँग्रेसने व बीजेपीने त्याला पाठिंबा दिला होता.

**मा. सभापती :-**

सचिवजी आपण ह्याच्यावर टेप वाजवून दुरुस्ती सुचवून घ्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ही जी दुरुस्ती दिली आहे ती दुरुस्ती टेप वाजवूनच दिली आहे.

**प्र. सचिव :-**

हे जे आपल्याला दुरुस्तीचे पान दिले आहे ते २९/०७/२००४ च्या इतिवृत्तांतामध्ये दुरुस्ती केलेली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ह्याच्यात देखील आपण दुरुस्ती करा.

**प्र. सचिव :-**

त्या इतिवृत्तांतात दुरुस्ती केली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ह्याला आपण आता मंजुरी देऊ तर आपण ह्याच्यात देखील टाका.

**मा. सभापती :-**

दुरुस्ती सुचविण्याकरिता आपण आता मंजुरी दिलेली आहे. तर त्या दुरुस्तीप्रमाणे करणार.

**प्र. सचिव :-**

ती दुरुस्ती केलेली आहे व ते पान देण्यांत आलेले आहे.

**गजानन भोईर :-**

म्हणजे गेल्या वेळी पण दुरुस्ती केली होती.

**प्र. सचिव :-**

त्याच्यात दुरुस्ती केली म्हणून त्यांना हे पान देण्यांत आलेले आहे आणि ही चर्चा आहे व २९/०७/२००४ इतिवृत्तांतात त्यांची दुरुस्ती होती. ते जे वाक्य आहे ते त्या ठिकाणी दुरुस्त केलेले आहे. त्याचे पान आपणाला देण्यांत आलेले आहे.

**गजानन भोईर :-**

ते ह्या प्रोसिडींगमध्ये का आले नाही? त्यांनी हे तुमच्याकडून मागवून घेतले.

**प्र. सचिव :-**

नाही. आम्ही जी दुरुस्ती केली म्हणून त्या दुरुस्तीचे पान त्यांना दिले आहे.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. दुरुस्ती करण्यांत यावी.

**अनंत पाटील :-**

दि. २१/०८/२००४ रोजीच्या इतिवृत्तांतात पान क्र. ८ मध्ये भुईभाडेबाबत बोलायचे आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांनी जी सुचना मांडली त्याबाबतची कम्प्लाईन रिपोर्ट नंतर घेण्यांत येईल. विषयानंतर तुम्हांला वेळ देण्यांत येईल. तुम्ही विषय नोट करुन ठेवा. त्या विषयावर तुम्हांला सभेनंतर बोलण्यांस मुभा दिली जाईल.

**अशोक पाटील :-**

दि. २३/०८/२००४ रोजीच्या इतिवृत्तांतात पान क्र. ९ वर माझे वाक्य असे आहे की, ठेका रद्द केला जाईल का? त्याच्यानंतर सभापतींचे वाक्य आहे, ठेका रद्द केला जाईल का. त्यांच्या शब्दालाही प्रश्नचिन्ह आहे. मी जो प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर पाहिजे तर दोघांच्या शब्दाला प्रश्नचिन्ह आले आहे.

**प्र. सचिव :-**

प्रश्नचिन्ह काढण्यांत येईल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पान क्र. ७ वर पण त्यांना मिळते की नाही तर त्यांना कमी पगार मिळतो. पगार मिळतो की नाही? साफसफाई त्याच पद्धतीने होणार काय?

**प्र. सचिव :-**

कमी पगार मिळतो असे पाहिजे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

होय. आपण त्यांना रु. १२५/- कोणत्या बेसवर देता असे विचारले आहे.

**अशोक पाटील :-**

पान क्र. १३ वर हे संटींग केली तर बेटींग वाटते म्हणजे टेंडर हे सेटींग वाटते असे पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

पान क्र. १८ वर जो ठराव मांडलेला आहे. त्याबाबत मला बोलायचे आहे.

**मा. सभापती :-**

ह्याच्यामध्ये दुरुस्ती काही नाही ना?

**प्रभात पाटील :-**

नाही. याबाबत बोलायचे आहे.

**मा. सभापती :-**

सभेनंतर बोलावे.

**रिटा शाह :-**

दि. २३/०८/२००४ रोजीच्या इतिवृत्तांतात पान क्र. १५ मध्ये त्या ठरावावर आपण नांव लिहिले आहे, प्रेमनाथ पाटील. ह्यांचेपण त्याच्यामध्ये अनुमोदन मी केले होते व कांबळे साहेब सभा झाल्यानंतर माझ्याकडे साईन घ्यायला आले आणि कसे काय झाले व त्या ठिकाणी सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील ह्याचे अनुमोदन टाकलेले आहे. ह्या ठरावात नांव कसे बदलले व ह्या इतिवृत्तांतात तसे लिहिले देखील आहे. पान क्र. १५ मध्ये प्रभात पाटील ह्यांनी जो ठराव मांडलेला आहे त्याला माझे अनुमोदन आहे आणि त्या ठरावाच्या अनुमोदनामध्ये सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील ह्यांचे नांव आले आहे. ते आपण कुठल्या मजबुरीने घेतले आहे.

**प्र. सचिव :-**

प्रशासनाने, आरोग्य विभागाने ठरावावर सही करुन माझ्याकडे दिलेले आहे.

**रिटा शाह :-**

कांबळे साहेब, हा ठराव माझ्याकडे घेऊन आले होते.

**प्र. सचिव :-**

मला ठराव आरोग्य विभागाकडून देण्यांत आलेला आहे.

**रिटा शाह :-**

कांबळे साहेब, माझ्याकडे सिग्नेचर घ्यायला आले होते आणि सन्मा. सदस्यांचे नांव लिहिले गेले आहे. त्याच्याशी माझे दुमत नाही. पण मी या ठरावास अनुमोदन दिलेले आहे ते ह्याच्यात लिहिलेले आहे आणि तिथे दुसऱ्याचे नांव येते त्यात मजबुरी काय आहे?

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, गेल्या १३/०८/२००४ च्या पान क्र. १६ च्या इतिवृत्तांतात माझी दुरुस्ती आहे.

**प्र. सचिव :-**

तो विषय पेंन्डींग ठेवण्यांत आलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

अगोदर सन्मा. सदस्या रिटाजी शाह ह्यांनी ठरावास अनुमोदन दिले. नंतर मग मी पुन्हा अनुमोदन दिले होते.

**रिटा शाह :-**

जर सन्मा. सदस्यांनी अनुमोदन दिले आहे तर आपण मला प्रोसिडींगमध्ये सांगा की, त्यांचे नांव देखील यायला पाहिजे की, सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील ह्यांनी अनुमोदन दिले आहे. तशी ओळ कुठे आहे? ते आपण मला दाखवा. जसे ह्याच्यात पान क्र. १५ वर रिटा शाह, प्रभात पाटील ह्यांनी जो ठराव मांडला आहे. त्याला मी अनुमोदन करत आहे. नंतर तुम्ही अनुमोदनामध्ये माझे नांव टाकले. तसे प्रेमनाथ पाटील ह्यांनी अगोदर अनुमोदन दिले आहे ते कुठे आहे? अन्यथा आपण टेप वाजवून बघा. जर लिहायचे राहिले असेल तर?

**मा. सभापती :-**

त्यावेळेला दोघांनी अनुमोदन दिले होते.

**रिटा शाह :-**

साहेब, दोघांनी अनुमोदन दिलेले नाही. ते कसे काय झाले आहे ते आपणांस मी सांगते. सभा संपल्यानंतर कांबळे साहेब माझ्याकडे तो ठराव सही करायला घेऊन आले आणि माझी व त्यांची भेट झाली नाही, म्हणून ठराव त्यांना घाईगर्दीने करायचा होता म्हणून त्यांनी कोणाचीही सही घेतली. साहेब असे चालत नाही.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

तुम्ही सांगितले की, सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील व रिटा शाह ह्या लोकांनी ठराव मांडलेला आहे.

**रिटा शाह :-**

आपण टेप वाजवा. जर असे आहे ना की, तुम्ही टेपचा शब्द न् शब्द प्रोसिडींगमध्ये आणता. मग ह्याच्यामध्ये प्रेमनाथ पाटील व अनुमोदन आहे असे सभेमध्ये बोललेले शब्द आपण मला दाखवा.

**मा. सभापती :-**

दोघांनी अनुमोदन दिले होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

मी पहिले अनुमोदन दिले होते.

**रिटा शाह :-**

मी मान्य करते की, सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील ह्यांनी अनुमोदन दिले आहे. ते मी मान्य करते. मग आपण ते प्रोसिडींगमध्ये दाखवा. मग तुम्ही माझे नांव लिहिले आणि त्यांचे का लिहिले नाही?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील व सन्मा. सदस्या रिटा शाह ह्या दोघांनी अनुमोदन दिले तर सचिवजी त्याचा उल्लेख प्रोसिडींगमध्ये आणला नाही?

**रिटा शाह :-**

त्याचा उल्लेख कुठे आहे? तुम्ही कॅसेट काढा आणि अनुमोदन दोन झाले की, तीन झाले ते बघा. सर्वांचे सर्वानुमते झाले होते. पण ते अनुमोदन मी केले आहे. कांबळे साहेब, ही दुःखाची गोष्ट आहे. ते मला भेटले, मला सही द्या म्हणून. पण मला रणखांब साहेबांकडे काम होते त्यामुळे मी लगेच तिथे गेली, मी भेटली नाही व नंतर ते मला विचारायलाच आले नाही की, आपण अनुमोदन म्हणून सही करा. ॲक्चुअली ठराव सुरुवात झाले, सन्मा. सदस्या प्रभात पाटील ह्यांनी ठराव केला होता त्यानंतर त्यावर चर्चा सुरु झाली. त्यानंतर सभापती साहेबांनी सांगितले की, आपल्याला हे करुन घ्यायचे आहे. महत्वाचे काम आहे. लगेचच ठराव मांडा आणि त्यांनी ठराव मांडल्यावर मी लगेच अनुमोदन केले. मी नाही ना बोलत की, मी अनुमोदन केले आहे आणि ते तसे पान क्र. १५ वर आलेले आहे की, रिटा शाह ह्यांनी अनुमोदन केलेले आहे. मला काही कामाचा विरोध नाही. जे तुमच्या कायदेशीर असेल ते तुम्ही मला प्रोसिडींगमध्ये दाखवून द्या आणि तुम्ही टेप वाजवा आणि बघा की, अनुमोदन प्रेमनाथ पाटील साहेब ह्यांचे आहे किंवा नाही. हा एक नगरसेवकाच्या हक्काचा प्रश्न आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सभा संपल्यानंतर टेप वाजवून दाखवा आणि कोणाचे नांव असेल त्यांचे नांव टाकून घ्या.

**रिटा शाह :-**

फक्त मला प्रोसिडींगमध्ये दाखवा की, सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील असे बोलले की, जसे सन्मा. सदस्या प्रभात पाटील हे ठराव मांडत आहे असे ह्यांचे शब्द दाखवा की, मी अनुमोदन केले असे प्रोसिडींगमध्ये दाखवा. टेपची गोष्ट नंतर येते.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या रिटा शाहजी आपला ह्याच्यावर आक्षेप आहे का?

**रिटा शाह :-**

साहेब, आक्षेपाचा प्रश्न नाही. माझ्या अधिकाराचा प्रश्न आहे. मी अनुमोदन केलेले आहे.

**मा. सभापती :-**

म्हणून आपल्याला विचारतो की, आपला ह्याच्यावर आक्षेप आहे का?

**रिटा शाह :-**

आक्षेप असे नाही. माझे नांव का टाकले नाही? त्याचे आपण मला उत्तर द्या.

**मा. सभापती :-**

तेच मी तुम्हांला बोलतो. ह्याच्यावर तुमचे ऑब्जेक्शन आहे का?

**रिटा शाह :-**

होय, माझे ऑब्जेक्शन आहे.

**मा. सभापती :-**

त्यांचे ऑब्जेक्शन आहे तर सचिवजी आणि रणखांब साहेब, ह्याच्यावर काय करायचे ते आपण सांगा.

**रिटा शाह :-**

मी अनुमोदन दिले आहे. माझे नांव यायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

जर पान क्र. १५ वर सन्मा. सदस्या रिटा शाह ह्यांनी जे ऑब्जेक्शन घेतले आहे. टेपमध्ये वाजवून जर त्यांचे नांव असेल तर त्या ठिकाणी आपण त्यांची सही घ्यावी आणि त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यांत यावी.

**रिटा शाह :-**

तुम्ही टेप ऐकूनच ही प्रोसिडींग लिहिली ना? मग तुम्ही ऐकलेले नेहमी खोटं असते असे काय आहे का? की, तुमचे तुमच्यावरच विश्वास नाही असे आहे का?

**मा. सभापती :-**

सचिवजी मी रुलिंग दिलेले आहे. तुम्ही मध्ये बोलू नका आणि तुम्हांला जर बोलायचे असेल तर तुम्ही मला सांगा मी सदस्यांना उत्तर देतो.

**रिटा शाह :-**

मोहन पाटील साहेब, तुम्ही असे करुन माझा आवाज दाबायची कोशिश करत असाल तर मी येथे माझा हक्क मागत आहे.

**मा. सभापती :-**

तुम्हांला मी रुलिंग दिलेली आहे.

**रिटा शाह :-**

तुम्ही रुलिंग दिलेली आहे की, टेप वाजवा. शेवटी उत्तर तेच मिळणार आहे. असे करुन जर तुम्हांला सदस्यांचे आवाज थांबवायचे असेल तर आम्ही आवाज थांबवून ठेवू.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या मी तुमचा आवाज थांबवत नाही. तुम्हांला मी रुलिंग दिले. जर ह्या टेपमध्ये आढळले असेल तर आपली ती दुरुस्ती करण्यांत यावी.

**रिटा शाह :-**

साहेब आपण सभापती आहात आणि आपण जर म्हणत असाल ते टेपमध्ये आले असेल पण ते टेपमध्ये पान क्र. १५ वर अनुमोदन देत आहे अशी नोंद आहे.

**मा. सभापती :-**

आलेले आहे म्हणून तुम्हांला बोलतो की, जर........

**रिटा शाह :-**

जरचा प्रश्नच येत नाही. ते डेफिनेट आलेले आहे.

**मा. सभापती :-**

ते बरोबर आहे. म्हणून टेप वाजवून खात्री करुन ती दुरुस्ती करण्यांत यावी. मॅडम आपण येथे प्रोसिडींग दुरुस्तीसाठी आणतो.

**रिटा शाह :-**

ते मान्य आहे. जर आपण तो सांगतो तर आपण शेवटी डेफिनेट असतो. ही प्रोसिडींग आपण टेप ऐकून लिहितच नाही. ह्याचा अर्थ असा झाला आहे.

**मा. सभापती :-**

आपण ह्या ठिकाणी जी सुचना मांडलेली आहे ती सुचना येथे नोंद करण्यांत आलेली आहे आणि जर ते आपल्याला ते टेपमध्ये आढळले तर त्या नावावर आपले नांव लिहून आपली पुन्हा सही घेण्यांत येईल.

**प्रभात पाटील :-**

प्रभाग क्र. ७ आणि २४ चे जे टेंडर दिले गेलेले आहे त्याचा ठराव मी मांडला आहे आणि जर आज प्रभाग ७ मध्ये जर तुम्ही फिरलात तर सगळ्या मिरा भाईंदरमध्ये तो घाणीचा प्रभाग आहे. मी प्रभाग क्र. २४ चे बोलत नाही. तिथे माणसे कोणाकोणाची आहे ते मला चांगले माहिती आहे. माझ्या प्रभागामध्ये जी घाण आहे तशी घाण संपूर्ण मिरा भाईंदरमध्ये शोधून दाखवा, गेल्या दोन महिन्यांमध्ये.

**गजानन भोईर :-**

या गोष्टीला मी तिथला नगरसेवक म्हणून दुजोरा देतोय.

**प्रेमनाथ पाटील :-**

याबाबत मी पत्र दिले आहे.

**प्रभात पाटील :-**

दोन पत्र दिले. याबाबत तुम्हांलाही माझे पत्र आले असेल. ते मी सभापती साहेब आणि आयुक्त साहेब यांच्या नावाने पत्र दिलेले आहे आणि माझ्या प्रभागातील ७ नंबरचे.

**गजानन भोईर :-**

मागच्या वेळी आम्ही राज कन्स्ट्रक्शनचे सांगितले. त्यावर अधिका-यांचे अजूनही लक्ष नाही आहे.

**प्रभात पाटील :-**

म्हणून सांगते की, प्रभाग क्र. ७ मधला टेंडर त्यांच्याकडून काढून घ्या आणि प्रभाग क्र. २४ वर मला बोलायचे नाही आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साफसफाईची प्रत्येक वार्डातील समस्या आहे. आमच्याही वॉर्डाची साफसफाई होत नाही.

**प्रभात पाटील :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर, मी तुम्हांला सांगते की, मी असा ठराव मांडते. प्रभाग क्र. ७ मधला जो ठेका आहे तो त्या ठेकेदारांकडून काढून घ्या. तुम्ही नव्याने टेंडर काढा. या व्यतिरिक्त मला दुसरे काही नको. कारण मी सगळ्यांना बोलून झाले आहे. पालिकेच्या अधिका-यांपासून, सभापती, आयुक्त सर्वांना दोन महिन्यात पत्रव्यवहार करुन झालेला आहे. त्याच्यात काहीही सुधारणा नाही आहे. माझ्याकडे गेल्या दोन महिन्यांमध्ये पाच कचराकुंड्या निर्माण झाल्या आहेत आणि त्या कचराकुंड्या तिथे कधीच नव्हत्या. मिरा भाईंदरमध्ये त्या कचराकुंड्या माझ्या एका प्रभागामध्ये पाच ठिकाणी झाल्या आहेत आणि म्हणून मला हा ठेकेदार नको आहे. तुम्ही त्याचे नविन टेंडर काढायचे. सन्मा. सदस्य गजानन भोईरजी आता आपण बोला. आपण त्या प्रभागाचे दुसरे नगरसेवक आहात.

**गजानन भोईर :-**

खरं तर मेन जे गटार आहेत ते साफ केले नाहीत.

**प्रभात पाटील :-**

साहेब, गटार सोडा. कचराकुंड्या निर्माण झालेल्या आहेत.

**गजानन भोईर :-**

साहेब, गटारातील जी घाण काढलेली असते ती ही तिथे तशीच असते. ती दोन दोन दिवस घाण उचलली जात नाही. तो पहिल्यापासूनचा आमचा अनुभव आहे आणि ते आम्ही सांगता आलो आहे. असे वारंवार का होते? जाणूनबुजून केले जाते.

**प्रभात पाटील :-**

प्रभाग क्र. ७ मधील ठेका त्यांच्याकडून काढून घ्या. २४ चे काय करायचे ते सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील आपल्याला बोलतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रभाग क्र. २४ बद्दल मीही पत्र दिलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

आपण तो ठेका रद्द करा आणि प्रभाग क्र. ७ आणि २४ साठी नव्याने ठेका द्या आणि त्याचे आतापर्यंत झालेल्या कामाचा मोबदला त्याला देण्यांत यावा असा ठराव मी नव्याने मांडते.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या प्रभातजी पाटील याबाबत ठराव होऊ शकत नाही.

**प्रभात पाटील :-**

आपण काम थांबवू शकता. काम समाधानकारक नसेल तर सेवाशर्तीमध्ये तसे मुद्दे घातलेले असतात.

**मा. सभापती :-**

आपले पत्र मला या ठिकाणी प्राप्त झालेले आहे आणि त्या पत्राप्रमाणे मी संबंधित खात्याला त्या कामाबद्दल जे संपूर्ण प्रभागनिहाय जो साफसफाईचा ठेका दिलेला आहे. त्याच्याबद्दल मी खात्यांना त्याच्याविषयी पत्र दिलेले आहे. त्याची माहिती मागितलेली आहे आणि पुढच्या विषयामध्ये पुढच्या सभेमध्ये आपण तो विषय घेत आहोत आणि विषय घेऊन आपल्या ज्या काही सुचना असतील व त्यात ज्या काही त्रुटी असतील त्या त्रुटींवर विचार करुन संबंधितांवर आपल्याला जी कारवाई करायला पाहिजे व जी ॲक्शन घ्यायला पाहिजे ती ॲक्शन आपण सभेमध्ये ठरवून तशी ॲक्शन पुढे घेण्यांत येईल असे मी तुम्हांला सांगू इच्छितो.

**प्रभात पाटील :-**

ह्याच्यात नमुद करा की, प्रभाग क्र. ७ आणि २४ च्या ठेक्याला आमचा आक्षेप आहे. ह्याची प्रोसिडींगमध्ये नोंद झाली पाहिजे की, प्रभाग क्र. ७ आणि २४ च्या ठेक्याला आमचा आक्षेप आहे आणि सदरच्या बाबतीत कामाच्या पुन्हा निविदा मागविण्यांत याव्यात अशी आपण तिथे नोंद करा, तो विषय घेतल्यानंतर.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, आरोग्याचा प्रश्न निघाला तेव्हा मी असे सांगू इच्छितो की, आरोग्य खात्याची आपण पुर्नरचना करा की, पालिकेच्या हद्दीत कोणत्याही प्रभागात स्वच्छता ही होतच नाही आणि औषधाची फवारणी ती ही बरोबर होत नाही. सर्वत्र डासांचे थैमान चालू आहे आणि हवे असल्यास आपण प्रत्यक्षात संध्याकाळी फिरा की, मिरा भाईंदरमध्ये सहाच्या नंतर तुम्ही रस्त्यावर उभे राहू शकत नाही अशी परिस्थिती आहे. एवढे डास झालेले आहेत. त्याच्यावर आपण काय कार्यवाही करु शकता?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांना आरोग्याबद्दल जे काही प्रश्न मांडायचे असतील व त्यांच्या ज्या काही सुचना असतील त्या सुचना आपण येथे नमुद करा आणि मी मघाशी रुलिंग दिल्याप्रमाणे पुढच्या सभेला तो विषय घेऊन आढावा घेऊ.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण आरोग्य विषयासाठी स्वतंत्र एक सभा बोलवा.

**मा. सभापती :-**

प्रभाग निहाय साफसफाई ठेका आणि आरोग्याबद्दल आल्या ज्या काही सुचना असतील त्या सुचनांविषयी आपले जे काही लेखी निवेदन असतील ते आपण माझ्या दालनामध्ये व पालिकेमध्ये द्यावेत आणि त्या अनुषंगाने आपण ते पुढच्या सभेला तो विषय घेऊन आढावा घेऊ व जी आपल्याला तत्परतेने ॲक्शन घेता येईल आणि त्याच्यामध्ये सुचना करता येतील अशा पद्धतीने चांगले आरोग्य लोकांचे राहीले पाहिजे आणि लोकांना चांगला दिलासा मिळाला पाहिजे याबद्दल आपण जरुर ॲक्शन घेऊ.

**केशव घरत :-**

सभापती साहेब, मला पल्स पोलिओबद्दल बोलायचे आहे.

**मा. सभापती :-**

आता पल्स पोलिओचा विषय नाही. आपण याबाबत सभेनंतर बोलावे.

**केशव घरत :-**

पण हे कामासंदर्भातच आहे.

**मा. सभापती :-**

आपण बोला पण नंतर बोला. हा विषय संपल्यानंतर ज्या विषयावर तुम्हांला बोलायचे आहे त्या विषयावर बोलायला वेळ देण्यांत येईल आणि त्या वेळेमध्ये आपण बोला.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, ही आरोग्य विषयी सभा आपण केव्हा लावणार? साधारणतः एक आठवड्यानंतर की, उद्या-परवा?

**मा. सभापती :-**

एक-दोन आठवड्यांत सभा लावू. म्हणजे दिवाळी गेल्यानंतर आपण सभा लावू.

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेब, मी एवढेच म्हणेन की, ह्या शहराच्या स्वास्थाशी आणि आरोग्याशी निगडीत हा प्रश्न आहे आणि येथे कुठेतरी ह्या ठेकेदाराला कोणीही तो बांधकामाचा ठेकेदार उठतो आणि आरोग्याचा ठेका घेतो. कोणता एक माणूस येतो येथे पैशाचे व्यवहार करतात आणि ठेके घेतात आणि येथे माणसाच्या जीवनाशी खेळण्याचा हा प्रश्न चाललेला आहे. म्हणून या संदर्भामध्ये ठोस असा निर्णय घ्या की, त्याचा सबक सर्वांना मिळेल. मी तर तुम्हांला परत एकदा सांगेन की, मी ह्याच्याकरिता पुन्हा एकदा हटून बसणार आहे की, माझ्या प्रभागात हा ठेकेदार नको आणि माझे संबंधित नगरसेवकसुद्धा त्याला.

**प्रेमनाथ पाटील :-**

तो ठेकेदार नकोच आहे.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, आपण हे आरोग्य विभागाला साफसफाईसाठी वर्षभर जवळ जवळ सात करोड रुपये खर्च करतो. ह्या सात करोड रुपयामध्ये आरोग्य विभागाने ठोसपणे सांगावे की, शहरातील डास निर्मुलन झालेले आहे का? की, खरोखर साफसफाई योग्य रितीने होते का? असे एकदम ठामपणे आरोग्य विभाग सांगू शकते का?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य आशोक पाटीलजी, आपण आपल्याला सर्व सन्मा. सदस्यांनी........

**अशोक पाटील :-**

तसे झाले असते तर आज ह्या नगरसेवकांच्या प्रतिक्रिया येथे उमटल्या नसत्या.

**मा. सभापती :-**

आपण ज्या प्रतिक्रिया येथे व्यक्त केलेल्या आहेत त्या अतिशय गंभीर प्रतिक्रिया आहेत.

**अशोक पाटील :-**

आम्हांला देखील बोलायचे आहे, जेव्हा तुम्ही स्पेशल विषय ठेवणार तेव्हा खुलासेवार बोलू या.

**मा. सभापती :-**

तेव्हा आपण खुलासेवार बोला आणि आपल्या ज्या तक्रारी असतील त्या लेखी स्वरुपामध्ये कार्यालयात द्याव्यात.

**प्रभात पाटील :-**

साहेब, तक्रारी येतील आणि ते तुम्ही वाचणार तो प्रश्न आहे. पण माझ्या घरची तक्रार आता बोलू नये, तरी सांगते. माझी २१-२२ वर्षाची मुलगी आहे. तिच्या सध्या स्किनवर डास चावून असा प्रकार झाला आणि आपल्या नगरपालिकेच्या डॉ. मिसेस पोसा (स्किन स्पेशालिस्ट) त्या कस्तुरी हॉस्पीटलमध्ये काम करतात त्यांची ट्रीटमेंन्ट चालू केली व त्यांचा रिपोर्ट आहे की, हीला डासांची एलर्जी झाली आहे आणि मी तिला बोरीवली पासून सगळ्या डॉक्टरांकडे घेऊन गेले आहे. असे जर इतक्या प्रमाणात माझ्या घरात आहे तर बाहेर किती असेल?

**अशोक पाटील :-**

हे एका लोकप्रतिनिधीचे जिवंत उदाहरण आहे. तर सर्वसामान्य नागरिकांची किती उदाहरणे असतील.

**प्रभात पाटील :-**

आपण डॉ. पोसाकडे याबाबत विचारणा करु शकता.

**मा. सभापती :-**

आपल्या विषयाची दखल घेण्यांत आलेली आहे आणि आपण गंभीरपणे ज्या सुचना येथे मांडलेल्या आहेत आणि त्याबद्दल अधिकाऱ्यांनी त्या विषयी पुढच्या सभेत तयारी करुन घ्यावी आणि अशा ज्या प्रतिक्रिया येतात त्या प्रतिक्रियेवर आपण जरुर त्या अधिकाऱ्याने विचार केला पाहिजे असे या ठिकाणी मी अधिकाऱ्यांना सांगत आहे. विधी सल्लागार आलेत का?

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, त्याच्या अगोदर मी महत्वाचे विचारु इच्छिते. विषय नाही पण मला माहिती पाहिजे की, मागे ४०-४५ लाखाचे काम मंजूर झालेले होते ते, रेल्वे समांतर नाल्यावर रोड बनवायचे. ते काम अजून का सुरु झाले नाही?

**मा. सभापती :-**

आपली सभा झाल्यानंतर आपल्याला ह्या विषयावर जरुर बोलायला देऊ. विधी सल्लागारांची या ठिकाणी उपस्थिती नाही आहे. मी उपायुक्त (मुख्यालय) साहेबांना सांगू इच्छितो, या ठिकाणी जेव्हा आपले विषय असतात आणि सर्व अधिकाऱ्यांनी या ठिकाणी लक्ष वेधून घ्यावे की, आपला विषय विषयपटलावर नसतांना व जो विषय प्रोसिडींगमध्ये येत असतो त्या विषयाची तयारी आपण केली पाहिजे आणि या ठिकाणी उपस्थिती असली पाहिजे. मी अधिकाऱ्यांना व उपायुक्त (मुख्यालय) साहेबांना फायनल सांगतो, जर असे अधिकारी या सभेला उपस्थित नसतील तर त्यांच्यावर जरुर कार्यवाही करण्याची परिस्थिती या स्थायी समितीवर येऊ नये याची दक्षता आपल्या प्रत्येक अधिकाऱ्याने घेतली पाहिजे. कारण आपला विषय विषयपटलावर असतो. हा विषय नाही आहे पण विषयपटलावर विषय नसतांना प्रोसिडींगमध्ये आपले जे विषय असतात त्या विषयाचा खुलासा आपण या ठिकाणी केला पाहिजे आणि सचिवजी जेव्हा आपण ह्या विषयाची माहिती संबंधित खात्यांना देतो त्यावेळेला इतिवृत्तांताची कॉपी सुद्धा आपण त्या संबंधित खात्याला दिली पाहिजे आणि त्या त्या खात्याकडे देताना त्या खात्याची जी माहिती असेल त्याच्यावर आपण रेड मार्क करुन किंवा मार्क करुन आपण ती कॉपी त्या संबंधित खात्याला दिली पाहिजे. याच्यापुढे असे होता कामा नये. आज पहिली सभा आहे आणि या ठिकाणी जी अनुपस्थिती दिलेली आहे. मुख्यालय साहेब तशी अनुपस्थितीची दखल घेण्यांत आली पाहिजे. कारण जरी आपल्याला कोर्टाचे काम असेल तरी त्या कोर्टाची तारीख ही आपल्याला २४ तासाच्या अगोदर माहिती मिळते. म्हणून जर आपण ही माहिती दिल्यानंतर अगोदर त्याची माहिती येथे आली पाहिजे आणि जर आपण अनुपस्थित राहणार असाल तर मुख्यालय या नात्याने ती माहिती आपल्याजवळ आली पाहिजे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

हे सगळे झाले तरी आपण त्या ठरावाचे काय करायचे?

**प्र. सचिव :-**

सर्व अधिकाऱ्यांना इतिवृत्त आगाऊ दिले जाते व त्यांच्या सुचना त्यांना पहायच्या आहेत.

**रिटा शाह :-**

मग सभापती साहेबांच्या रुलिंगप्रमाणे तुम्ही कार्यवाही करा.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीसजी आपण आता जे ठराव क्र. ९० चे सांगितले तर तोच विषय चालू आहे. त्याबाबतच मी अधिकाऱ्यांना आणि मुख्यालय ह्यांना रुलिंग दिली.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण तो तेवढा परिच्छेद काय करायचे?

**मा. सभापती :-**

आपण तो तेवढा परिच्छेद ठेवून देतोय आणि तो परिच्छेद आपण पुढच्या सभेला घेतोय.

**प्र. सचिव :-**

ठराव क्र. ९० पेंन्डींग ठेवून बाकीचे इतिवृत्त मंजुर?

**मा. सभापती :-**

होय.

**प्रभात पाटील :-**

माझ्या सुचनेसहीत.

**मा. सभापती :-**

आपण ठराव मांडा.

**प्रभात पाटील :-**

प्रभाग क्र. ७ आणि २४ चा ठेका वगळून बाकीच्या सर्व ठेक्यांना तुम्ही मंजुरी द्या.

**मा. सभापती :-**

आपण ही जी सुचना केली त्या सुचनेसह इतिवृत्तांत मंजुर आणि आपण ज्या ठेक्याबद्दल किंवा एखाद्या कामाबद्दल आपला जो आक्षेप असतो त्यावेळी तो विषयपटलावर विषय असल्यानंतर त्याच्यावर आपण रितसर कार्यवाही करु शकतो. म्हणून रितसर पुढच्या सभेला विषय घेऊन आपण त्याच्यावर रितसर कार्यवाही करु आणि आपली जी सुचना आली आहे त्या सुचनेसह.

**रिटा शाह :-**

सर्व सभासदांच्या सुचनेसह व ठराव क्र. ९० सोडून बाकीच्या इतिवृत्तांताला आम्ही मंजुरी देत आहोत.

**प्रभात पाटील :-**

नाही, माझे त्या आरोग्य विभागाच्या संदर्भामध्ये त्यांनी नोंद करावी. ७ आणि २४ चा जो ठेका आहे त्याबाबत पुर्नविचार करण्यासाठी तो ठेवण्यांत यावा.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. एक सुचना आहे. आपले जे विधी सल्लागार आहेत, त्यांच्या बंधूचे निधन झाले असल्या कारणाने ते आज हजर राहू शकले नाहीत.

**प्रकरण क्र. ९४ :-**

दि. १३/०८/२००४, दि. २१/०८/२००४, दि. २३/०८/२००४ व दि. १६/०९/२००४ रोजीचे मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १०३ :-**

दि. १३/०८/२००४ रोजीच्या इतिवृत्तांतामधील ठराव क्र. ९० वगळून, दि. २१/०८/२००४ रोजीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्या, दि. २३/०८/२००४ व दि. १६/०९/२००४ रोजीच्या इतिवृत्तांतांमध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह दि. १३/०८/२००४, दि. २१/०८/२००४, दि. २३/०८/२००४ व दि. १६/०९/२००४ रोजीचे मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील.** **अनुमोदन :- श्री. केशव घरत.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

इतिवृत्तांताचा विषय मंजुर झालेला आहे आणि आपले जे विघी सल्लागार आहेत त्यांच्या बंधूंचे निधन झालेले आहे. पण त्यांनी पुर्वकल्पना दिली नव्हती आणि अशी पुर्वकल्पना दिली पाहिजे. त्याबद्दल मी सभागृहाला माहिती देतो की, त्यांचे बंधु वारल्यामुळे ते सभेला येऊ शकले नाहीत.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९५ चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

उत्तनला आपण जी झाडाची लागवड केली आहे. ती लागवड किती आहे? त्याची संख्या मिळेल का?

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, आपण जी महानगरपालिकेतर्फे महापालिकेच्या हद्दीत ठेकेदारातर्फे जी झाडे लावली आहेत त्यांची संख्या आम्हांला समजेल का?

**अशोक पाटील :-**

भोईर साहेब, वन खात्याचे अधिकारी आपल्याला याबाबत सविस्तर माहिती देत आहेत. ती माहिती घेऊन मग आपण प्रश्न विचारु या.

**गजानन भोईर :-**

आपण ठेकेदारातर्फे किती झाडे लावलेली आहेत? त्यांची संख्या किती आहे? म्हणजे किती झाडे लावली होती? किती जगली आणि किती झाडे मेली? ह्यांची संख्या आपण आम्हांला द्या.

**अशोक पाटील :-**

या प्रस्तावासंबंधी वन अधिकाऱ्याने रिसतर माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**नागेश इरकर :-**

मा. सभापती साहबांच्या परवानगीने, महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे जतन अधिनियम १९७५ प्रकरण ४ कलम (ख) नुसार प्रत्येक पाच वर्षातुन एकदा महानगरपालिकेत वृक्षाची गणना करणे बंधनकारक आहे. डिसेंबर १९९६ नंतर प्रत्येक पाच वर्षातुन एकदा वृक्ष गणना कम्पलसरी केलेली आहे. आपल्या महानगरपालिकेत अजूनपर्यंत एकदाही वृक्ष गणना झाली नव्हती. त्यामुळे ही वृक्ष गणना करण्यासाठी हे काम आणले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

हे कायदेशीर बंधनकारक आहे का?

**नागेश इरकर :-**

होय, हे कायदेशीर बंधनकारक आहे.

**अशोक पाटील :-**

म्हणजे आतापर्यंत आपण कायदा पाळला नव्हता.

**नागेश इरकर :-**

पण आपली वृक्षप्राधिकरण समिती स्थापन झाली नव्हती.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, मी विचारलेल्या प्रश्नाचे आपण उत्तर द्या.

**मा. सभापती :-**

एक एक सदस्यांनी प्रश्न विचारा. आपल्याला त्याचे उत्तर इरकर देतील.

**गजानन भोईर :-**

आपण लावलेली झाडे किती?

**अशोक पाटील :-**

त्यांचे रितसर निवेदन होऊ दे.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण झाडे किती लावली?

**गजानन भोईर :-**

प्रश्न असा आहे की, लावलेली झाडे किती आणि त्यात ती झाडे जगली किती आणि किती झाडे मेली? व त्या मेलेल्या झाडांच्या ठिकाणी परत झाडे लावण्यांत आली का?

**नागेश इरकर :-**

आत्तापर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिकेत दहा हजार तीनशे पंचवीस झाडे आपण लावलेली आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण ही जी दहा हजार तीनशे पंचवीस झाडे लावलेली आहेत ती आपण दाखवू शकता का? ती झाडे आपण कुठे लावलेली आहेत?

**गजानन भोईर :-**

ती झाडे जगली किती? मेली किती व त्या ठिकाणी परत ते झाड लावण्यांत आले का? आणि ह्याच्यात किती झाडे जगलेली आहेत?

**नागेश इरकर :-**

एवढ्या झाडांचे पेमेन्ट आम्ही ठेकदाराला दिलेले आहे आणि आता नव्याने पुन्हा वृक्षगणना सुरु आहे.

**कैलासबेन जानी :-**

जेवढी झाडे जगलेली आहेत तेवढ्यांचेच पेमेन्ट द्यायचे होते.

**गजानन भोईर :-**

जगलेली झाडे तुमच्याकडे आहेत किंवा त्यांच्याकडे आहेत?

**नागेश इरकर :-**

आमच्याकडेच आहेत.

**गजानन भोईर :-**

जी झाडे जगली ती झाडे किती आहेत? पाच हजार आहेत, सहा हजार आहेत की, आहेतच नाही?

**नागेश इरकर :-**

दहा हजार तीनशे पंचवीस झाडे त्यावेळी जगली होती.

**गजानन भोईर :-**

आपण त्याची पाहणी केली होती का?

**नागेश इरकर :-**

नाही, त्याची आता पाहणी करायची आहे.

**कैलासबेन जानी :-**

पाहणी न केल्याशिवाय तुम्ही कसे झाडे जगली सांगता?

**केशव घरत :-**

साहेब, मग आपण त्यांना पेमेन्ट कसे काय दिले?

**गजानन भोईर :-**

त्यांना संपूर्ण पेमेन्ट कसे दिले?

**नागेश इरकर :-**

साहेब, त्यावेळी झाडे जगलेली होती. तीन चार महिन्यात.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांना विनंती करतो की, आपण जर एकेका सदस्याने प्रश्न विचारला तर त्यांनाही उत्तर देता येईल आणि आपल्या सभागृहालाही योग्य ती माहिती घेता येईल.

**गजानन भोईर :-**

आपण दहा हजार तीनशे पंचवीस झाडांची पाहणी केली तेव्हा ती झाडे संपूर्णपणे जिवंत होती. त्यानंतर त्यांना संपूर्ण पेमेंन्ट देऊन टाकले.

**नागेश इरकर :-**

होय. त्यावेळी पेमेन्ट दिलेले आहे.

**गजानन भोईर :-**

त्यावेळी त्यात अट होती का? की, ही एवढी झाडे एवढ्या महिन्यापर्यंत जगली पाहिजे. तर हे पेमेन्ट तुम्हांला दिले जाईल. त्यांनी काहीतरी रक्कम बाकी ठेवली असेल.

**नागेर इरकर :-**

मा. स्थायी समितीच्या ठरावाप्रमाणे चाळीस टक्के पेमेन्ट पहिल्या वर्षी दिलेले आहे.

**गजानन भोईर :-**

चाळीस टक्के पेमेन्ट दिले आणि उर्वरित बाकी होते.

**नागेश इरकर :-**

होय, उर्वरित पेमेन्ट बाकी आहे.

**गजानन भोईर :-**

त्यानंतर तुम्ही पाहणी करुन त्यांचे पेमेन्ट कापून त्यांना काय पेमेन्ट दिले का?

**नागेश इरकर :-**

सध्या वृक्षांची गणना सुरु आहे आणि अजून त्यांना दुसऱ्या वर्षीचे पेमेन्ट दिलेले नाही.

**नागेश इरकर :-**

होय, ४० टक्के पेमेन्ट केलेले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ह्या झाडांमधून किती झाडे जगली व किती झाडे मेली त्यांची तुम्हांला माहिती नाही?

**गजानन भोईर :-**

त्यांना त्याची अजून माहिती नाही आहे.

**नागेश इरकर :-**

महानगरपालिकेने दुसऱ्या वर्षाची मोजणी केलेली नाही.

**गजानन भोईर :-**

आपण आता वृक्ष गणना करणार आहात. तर वृक्ष गणना आपल्या महानगरपालिकेची जी हद्द आहे याच्यामध्ये संजय गांधी उद्यानाची काय सीमा मारली आहे का? आपली जी झाडे आहेत त्याच्यात

त्यांची काही सीमा आहे तर ती झाडे किती आहेत आणि त्या झाडांचे तुम्ही त्यांच्याकडून परमिशन घेतलेले आहे का की, ही जागा आम्हांला मोजायची आहे. असे तुमच्याकडे काय आहे का?

**नागेश इरकर :-**

आपले क्षेत्र ७९ चौ.कि.मी. पसरलेले आहे. त्यामध्ये खाजगी व सरकारी जमिनीवरील सर्व विद्यमान झाडांची गणना करण्यांत येईल.

**गजानन भोईर :-**

याबाबत संजय गांधी उद्यानाकडून परवानगी आहे का?

**रिटा शाह :-**

साहेब, आपण बोललात की, खाजगी जागेवर जी वृक्ष लावली ती झाडे आपलीच आहेत. हे कुठल्या बेसवर आपल्याला समजणार? ती प्लॉट मालकाने ही लावून घेतली असतील.

**नागेश इरकर :-**

खाजगी म्हणजे सोसायटीमध्ये असलेली झाडे. ती सर्व झाडे मोजणार.

**सुर्यकांत भोईर :-**

सोसायटीच्या आतमध्ये झाडे लावण्याकरिता आपल्याला परवानगी आहे का?

**गजानन भोईर :-**

आपल्याला हे आंब्याचे झाड आहे, हे चिंचेचे झाड आहे हे आपल्याला माहिती आहे का?

**नागेश इरकर :-**

त्यासाठी निविदांमध्ये इच्छुक अनुभवी ठेकेदारकडून निविदा मागवित आहोत.

**कैलासबेन जानी :-**

असा ठेकेदार तज्ञ आहे का?

**नागेश इरकर :-**

होय, त्यांनी एम.एस.सी. ॲग्री. केलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

आहे ना, तज्ञ आहे. त्यांनी तसे ठाणे आणि नांदेड महानगरपालिकेची वृक्ष गणना केलेली आहे.

**गजानन भोईर :-**

आपण संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाकडून तशी परमिशन घेतलेली आहे का, झाडांची वृक्षगणना करण्याकरिता? त्यांच्याकडून तयार करुन आणलेले आहे की, एवढी एवढी झाडे ह्याची आहेत असे ते तुम्हांला झाडे मोजण्याकरिता कसे देणार.

**नागेश इरकर :-**

त्यांच्याकडून परवानगी घेतली जाईल.

**गजानन भोईर :-**

परवानगी घेतली जाईल. मग अजून परवानगी घेतली नाही का?

**प्रेमनाथ पाटील :-**

ह्याचा अर्थ तिथे झाडे लावलेली नाहीत.

**गजानन भोईर :-**

झाडे लावली नाहीत. त्यांची जी जुनी झाडे आहेत ती मोजायची आहे.

**केशव घरत :-**

सभापती साहेब, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानवाले आपल्याला एक इंच जागा देखील देत नाहीत. ते आपल्याला झाडे देतील का? त्यांची बाऊण्ड्री आपल्या बाऊण्ड्रीत असल्यानंतर ते आपला हक्क कसा प्रस्तावित करुन देतील?

**गजानन भोईर :-**

तुमच्या घोडबंदरपर्यंत त्यांची बाऊण्ड्री आलेली आहे. हायवे आहे. हे संजय गांधी उद्यानाच्या बाऊण्ड्रीमध्ये येतो.

**केशव घरत :-**

बरोबर आहे. पण ते जर एक इंच देखील जागा सोडत नाही ते आपल्याला झाडांची मालकी देतील का?

**गजानन भोईर :-**

ती झाडे आपण मोजणी केल्यानंतर त्याच्यापासून आपल्याला काय फायदा आहे तेही आम्हांला येथे कळू दे. आपण त्याच्यावर खर्च करतोय.

**नागेश इरकर :-**

नेहमी सरकारी पत्रे येतात. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान त्यामुळे अचुक माहिती देणे वृक्षप्राधिकरणाला कायदेशीर बंधनकारक आहे. पाच वर्षातून एकदा वृक्षांची गणना करणे.

**गजानन भोईर :-**

मग तुम्ही परवानगी कधी घ्याल?

**कैलासबेन जानी :-**

वृक्षांची गणना केल्यानंतर आपण हा विषय आणा. आता कशाला आपण हा विषय आणला आहे?

**गजानन भोईर :-**

हा विषया आता कशाला आणला? तुम्ही पहिले त्यांची परवानगी घ्या.

**केशव घरत :-**

त्यांना ह्या कामाच्या खर्चासाठी मान्यता पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

माझ्या माहितीप्रमाणे तीन हजार झाडे देखील लावण्यांत आलेली नाही आणि दहा हजार तीनशे पंचवीसचा आकडे देत आहेत.

**गजानन भोईर :-**

ते तुम्हांला झाडे मोजू देतील का?

**कैलासबेन जानी :-**

आपण झाडांची गणना केल्यानंतर हा विषय परत आणा.

**प्रभात पाटील :-**

झाडे मोजण्यासाठीच हा विषय आहे.

**कैलासबेन जानी :-**

पण ते झाडे मोजायला देणार किंवा नाहीत याबाबत आपण त्यांची परमिशन घ्या.

**प्रभात पाटील :-**

वृक्ष प्राधिकरण समितीमध्ये ते रितसर घेतील.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, आपण संपूर्ण तयारी करा आणि त्याच्यानंतर आपण विषय आणा. कशाला अगोदर हा विषय आणता? ह्याला आम्ही मंजुरी देणार नाही.

**रिटा शाह :-**

महत्वाचा प्रश्न असा आहे की, किती झाडे जगली त्याची माहिती द्या आणि दुसरा प्रश्न असा की, ठेकेदारांनी लावलेली झाडे, खाजगी लोकांनी लावलेली झाडे त्यांची वेगळी आकडेवारी द्या आणि त्यानंतर आपण आमच्याकडे हा विषय आणा.

**अशोक पाटील :-**

इरकर साहेब, आपण ह्याच्यात उल्लेख केला आहे की, रस्त्याच्या दुतर्फा बरीच झाडे लावलेली आहेत. अशी किती रस्त्यांच्या दुतर्फा झाडे लावलेली आहेत?

**मा. सभापती :-**

आपल्याला वृक्ष जी लावायची आहेत त्याच्याबद्दल जी माहिती आपल्याला हवी आहे आणि मिरा भाईंदर शहरामध्ये जी झाडांची माहिती संपूर्णपणे सदस्यांकडे गेलेली नाही ती माहिती यायला पाहिजे. विषय असा की, त्या झाडांचे संगोपन कोणत्या पद्धतीने होते? किती झाडे आपण लावतो? खाजगी जागेत आपण किती झाडे लावलेली आहेत आणि ती झाडे लावल्यानंतर त्या झाडांची निगा जर आपण राखली नाही तर ठेकेदारांवर आपण कोणती ॲक्शन घेतो आणि कोणत्या अधिकाऱ्याने कामचुकारपणा केला असेल तर त्याच्यावर काय करता येते अशा पद्धतीचे जे प्रश्न या ठिकाणी आलेले आहेत त्या प्रश्नावर जरुर खुलासा आपल्याला या ठिकाणी करायचा आहे. तत्पुर्वी मी सभागृहाला या ठिकाणी माहिती देतो, ज्या पद्धतीने आपली अकरा वर्षानी, दहा वर्षांनी जनगणना होते त्याप्रमाणे त्या जनगणनेवर आपले सर्व काय जे संपूर्ण अवलंबून असते. निवडणुका वगैरे जे काही अन्य गोष्टी आहेत म्हणजे ज्या पद्धतीने सरकारने आपल्याला फॅसिलीटी द्यायला पाहिजेत ते ह्या जनगणनेवर अवलंबून असते. तर तो जनगणना हा विषय वेगळा आहे. परंतु, जेव्हा मिरा भाईंदर शहरामध्ये आपली जी झाडे आहेत त्या झाडांचीसुद्धा वृक्षगणना होते. सेन्सेस जी आपली जनगणना होते, त्याप्रमाणे मिरा भाईंदर शहरामध्ये आपण जेवढी झाडे लावलेली आहेत त्यांची वृक्षगणना होते आणि ती वृक्षगणना झाली पाहिजे. त्याकरिता आपला हा विषय आलेला आहे. म्हणजे महाराष्ट्र झाडाचे जतन अधिनियम १९७५

चे कलम ७(ख) १९९६ नुसार दर पाच वर्षांनी झाडांची वृक्षगणना व्हायला पाहिजे. तर ती गणना आपल्याकडे आजपर्यंत झाली नाही. त्याकरिता आपल्याकडे हा विषय आलेला आहे आणि आपल्याला पुर्व माहिती मिळाली पाहिजे म्हणून हा विषय आपण ठेवलेला आहे. परंतु, जर सन्मा. सदस्यांना जी माहिती मिळायला पाहिजे ती माहिती श्री. इरकरजी आपल्याकडून बरोबर देण्यांत आलेली नाही आणि जी झाडे या ठिकाणी आपण लावलेली आहेत आणि ती झाडे विकासकर्त्यांकडून किंवा अन्य लोकांकडून काढण्यांत आलेली आहेत. अशा झाडांची माहिती आपल्या खात्याकडे आहे का? जी झाडे आपण ठेकेदाराकडून लावली आणि ती झाडे लावल्यानंतर काही विकासकर्त्यांनी त्या ठिकाणी गटार काढण्याकरिता आपले कंम्पाऊंण्ड वॉल बांधण्याकरिता किंवा अन्य काही गोष्टी करण्याकरिता. कारण कालच परवा या ठिकाणी एक असे पत्र आले होते की मिरा रोडमध्य एक नारळाचे झाड आपण काढले. ती जी अशी झाडे काढलेली आहेत त्याच्यावर आपल्याकडे किती झाडांवर तक्रार आलेले आहेत आणि अशी किती झाडे काढण्यांत आलेली आहेत? कारण अशी किती झाडे काढण्यांत आलेली आहेत? याचा आपण खुलासा करावा आणि सन्मा. सदस्यांना जी जी माहिती असेल व जी जी माहिती आपल्याला हवी असेल त्या माहितीचा तपशिल आपण या ठिकाणी क्रमवार दिला पाहिजे. कारण या ठिकाणी सन्मा. सदस्य गजानन भोईर ह्यांनी काही माहिती विचारली. तसेच सन्मा. सदस्य अशोक पाटीलजी ह्यांनी माहिती विचारली. मध्येच सन्मा. सदस्या प्रभात पाटीलजी ह्यांनी माहिती दिली. तर त्या अधिका-यापर्यन्त जे आपण प्रश्न दिले ते प्रश्न व्यवस्थित जात नाही. ते प्रश्न आपण एक एक करुन विचारा आणि एक एक प्रश्न विचारुन ती माहिती आपण घ्या. त्या माहितीचा विषय आणि आपला जो विषय आलेला आहे ह्या दोन्ही विषयात तफावत आहे. कारण या झाडांची माहिती आपल्याला मिळाली पाहजे. त्यासाठी आपल्याला एक एजन्सी फिक्स करावी लागते. ती एजन्सी फिक्स करण्याकरिता आपल्याकडे हा विषय आलेला आहे. परंतु, जर झाडांची अशा पद्धतीने तक्रार आली असेल की जी माहिती आपल्याला हवी असेल आणि त्या माहितीप्रमाणे ती झाडे योग्य ठिकाणी लावलेली नसतील, खाजगी जागेत लावली असतील किंवा चुकीची लावलेली आहेत अशी जर आपली माहिती असेल ती आपण त्यंना ह्या ठिकाणी विचरावी. त्याची माहिती आपल्याला या ठिकणी देण्यांत येईल. म्हणून हा जो विषय आहे तो वृक्षगणनेचा विषय आहे. हा विषय कम्प्लीटली वेगळा आहे आणि जी माहिती आपण विचारतो ती माहिती आपल्याला क्रमप्राप्त आहे आणि ती माहिती आपल्याला मिळाली पाहिजे. कारण त्या झाडांची आस्था आपल्या मिरा भाईंदर शहरवासियांना आहे, आपल्या सदस्यांना आहे, आणि त्याच्यावर जे चुकीचे काम चालले असेल आणि चुकीच्या पद्धतीने झाडे लावली असतील आणि चुकीच्या पद्धतीने झाडे काढत असतील तर त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे आणि ती कारवाई का होत नाही? का झाली पाहिजे? ह्याची माहिती आपण जरुर विचारली पाहिजे.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, आपल्या परवानगीने बोलतोय. आपण हा जो वृक्षगणनेचा विषय आणलेला आहे. ह्याच्यामध्ये महाराष्ट्र अधिनियम १९७५ चे कलम ४(ख) अंतर्गत तरतुदीनुसार ही जी वृक्षगणना करण्यांत येणार आहे, दर पाच वर्षांनी आणि त्याच्यात ह्या वृक्षगणनेमध्ये वृक्षांची संख्या, वय, उंची, आकारमान आणि त्यांचे शास्त्रीय महत्व अशा पद्धतीची माहिती अंतर्भूत होणार आहे. तर ह्यासाठी आपण जो ठेकेदार किंवा आपण जी एजन्सी नेमणार आहात त्याचे काय निकष असणार आहेत. त्या एजन्सी मार्फत आपण हे काम कुठल्या एजन्सीला देऊ शकतात त्याचे काय निकष तुम्ही दर्शविलेले आहे. का एखादा बांधकाम संबंधी आहे का की, एखादा बांधकाम ठेकेदार येथे टेंडर घ्यायला येईल आणि तो वृक्षगणना करेल असे तर नाही ना?

**मा. सभापती :-**

याबाबत ह्याचा खुलासा करण्यांत यावा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

या ठिकाणी वृक्षगणनेचा विषय स्थायी समिती समोर मांडला आहे. त्या विषयाबाबत मा. सभापती साहेबांच्या परवानगीने माहिती देतोय. मा. सभापती साहेबांनी सुरुवातीला ह्याचे विश्लेषण केले की, वृक्षगणना करणे हा वेगळा विषय आहे आणि आपण जे प्रश्न विचारणे आवश्यक होते ते प्रश्न वेगळ्या पद्धतीने म्हणजे वृक्ष किती लागले? त्याचे जतन कसे केले? व त्यात किती झाडे जगली? व किती झाडे मेलीत? हा अत्यंत रास्त प्रश्न आहे आणि त्याचे उत्तर आपल्याला पूर्णपणे दिले गेले पाहिजे. पण प्रश्न दुसरा असा आहे की, हा जो विषय आपल्यासमोर मांडला गेला आहे, वृक्षगणना करण्याचा तर वृक्षगणना करण्यासाठी आपल्याला वृक्षप्राधिकरणामार्फत दर पाच वर्षांनी वृक्षांची गणना करणे आवश्यक असते आणि त्याच्यात कायदेशीर निकष देखील आहेत आणि त्यांनी प्लस ह्याच्यात वृक्षांची वर्गवारी करायची ती जी सक्षम संस्था आहे, ज्या संस्थेने ह्याच्यापुर्वी वन विभागामध्ये म्हणजे

कुठलाही ठेकेदार येईल आणि त्याने हे आठ-दहा लाखाचे टेंडर घ्यायचे आणि झाडांची गणना करायचे असे त्याच्यामध्ये अभिप्रेत नाही. त्याच्यात आपल्या महानगरपालिकेच्या हद्दीत एकूण किती झाडे आहेत? म्हणजे प्रत्येक झाडाचे वर्गीकरण त्याबाबत मी सविस्तर सांगतो. त्या झाडाची उंची, वय वगैरे असे संपूर्ण शास्त्रीय विश्लेषण आणि शास्त्रीय विश्लेषण करणाऱ्या संस्था महाराष्ट्रामध्ये कार्यरत आहेत, भारतामध्ये कार्यरत आहेत. आपण एक जाहिर निविदा प्रसिद्ध केल्यानंतर त्याचे जे निकष आहेत. जी निविदा आहे ती आपल्यासमोर येतील आणि त्यांनी वन विभागामध्ये तर महाराष्ट्रातच नव्हे तर भारतीय स्तरावर त्यांनी काय काय काम केले आहे? त्याच्यात तांत्रिक कॅपेबिलीटी, तांत्रिक क्षमता किती आहे? त्याच्यात कोण काम करत आहे? कोणत्या संस्था त्याच्यात इन्व्हॉल्व्ह आहेत? ह्याची संपूर्ण खातरजमा होईल. त्याची खात्री आपल्यासमोर झाल्यानंतर ही संस्था काम करण्याकरिता योग्य आहे किंवा नाही? त्यांनी महाराष्ट्रातील इतर महानगरपालिकेचे काम कधी केले? किती केले? कुठल्याप्रकारे त्याची गणना केली? ह्याची माहिती आपल्यासमोर आल्यानंतरच आपण त्याला मान्यता देणार आणि आता प्राथमिक मान्यतेसाठी आपल्याकडे हा विषय आलेला आहे आणि हा विषय आणि दुसरा विषय ह्याच्यात आपण थोडीशी गफलत करत आहोत की, दुसरा विषय आहे की, वृक्षप्राधिकरणाने किती झाडे लावली? तर तो अत्यत रास्त प्रश्न आहे. त्याच्यापैकी किती झाडे जगली? किती झाडे शिल्लक आहेत? त्याच्यावर आपले नियंत्रण आहे किंवा नाही? व सगळ्यात दुसरा मा. सभापती साहेबांनी उद्‌घोषीत केलेला नविन मुद्दा की, वृक्षप्राधिकणामार्फत जो लाखो रुपये खर्च करुन आपण झाडे लावतो तर ती झाडे कुठला विकासक जर परस्पर तोडत असेल, वृक्षप्राधिकरणातर्फे आम्ही त्याच्यावर कार्यवाही निश्चितपणे करु हे आश्वासन व खात्री मी ह्या ठिकाणी आपल्याला देतो आणि अशा प्रकारची कार्यवाही आम्ही ह्या ठिकाणी करणार आहोत आणि ह्या दोन विषयाशी गफलत आपण करुन नये. पहिल्या विषयाला ही प्राथमिक मान्यता आहे व त्याची निविदा आपल्यासमोर आल्यानंतर त्याचे सविस्तर विश्लेषण होईल व नंतरच आपल्याला त्याची मान्यता द्यायची आहे आणि ही प्राथमिक मान्यता आपण ह्या ठिकाणी घेत आहोत.

**गजानन भोईर :-**

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाकडून आपण त्यांच्याकडून अशी काही परवानगी मागितली आहे आणि त्यांनी दिली आहे का, त्यांच्या हद्दीतील झाडे मोजण्याकरिता?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ती हद्द जर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये असेल तर त्यांना ती परवानगी कायद्यानुसार द्यायलाच पाहिजे. ती हद्द महानगरपालिकेच्या बाहेर असेल तर तेथील वृक्ष मोजण्याची जबाबदारी आपल्यावर नाही.

**गजानन भोईर :-**

ते महानगरपालिकेच्या हद्दीत आहे का?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

हद्दीत असेल तर वृक्षगणना ही जी प्राधिकरण आहे हे वृक्षप्राधिकरण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कायद्यामध्ये तो अंतिम अधिकार असतो. त्यामुळे जरी वनविभाग असेल तरी वृक्षगणना करण्याची परवानगी आपल्याला दिली पाहिजे आणि ती रितसर परवानगी घेऊन आपण पुढची कार्यवाही करु.

**सुर्यकांत भोईर :-**

मिरा भाईंदरच्या हद्दीमध्ये जर आपल्याला झाडे तोडायची आहेत तर त्याची परवानगी कोणाकडून घेणार? तुमच्याकडून घ्यायची, महापालिकेकडून घ्यायची की कोणाकडून?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये कुठलेही झाड लावणे, तोडणे व कुठल्याही प्रकारची कार्यवाही करण्याचा पुर्णपणे अधिकार वृक्षप्राधिकरणांवर वृक्ष अधिकारी ह्यांना आहेत. त्याच्या व्यतिरिक्त कोणीही परवानगी देऊ शकत नाही. याच्यापुर्वी दिली असेल तर ते चुकीचे आहे. या येथे मी स्पष्टपणे सांगतो तो अधिकार फक्त वृक्षप्राधिकरणाचा आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, माझा असा प्रश्न आहे की, कुठल्याही प्रायव्हेट सोसायटींना झाडे लावायची असतील तर तुमच्याकडून लेखी परवानगी मागितली आणि तुमच्याकडून झाडे लावून घेतली तर ती आपण झाडे लावून देऊ शकतो का? जर सोसायटीने मागणी केली तरच?

**प्रभात पाटील :-**

आपण सोसायटीला रोपे देतो?

**मा. सभापती :-**

सोसायटीच्या प्रिमायसेसमध्ये जर आपल्याला झाडे लावायची असतील तर आपण आजपर्यंत मिरा भाईंदर नगरपालिका असतांना आणि महानगरपालिका असेपर्यंत आपण त्यांना झाडे देतो आणि ती झाडे लावण्याची संपूर्ण जबाबदारी त्या सोसायटीची असते आणि जी झाडे सोसायटीच्या बाहेर असतील, आपल्या सार्वजनिक ठिकाणी असेल तर त्याची संपूर्ण जबाबदारी मिरा भाईंदर महानगरपालिकेची असणार आहे.

**रिटा शाह :-**

माझा प्रश्न असा आहे की, आम्ही पत्रव्यवहार केला तर आपण अशी रोपे त्या सोसायटीला देणार का?

**मा. सभापती :-**

होय, तशी रोपे देण्यांत येतील.

**कैलासबेन जानी :-**

सभापती साहेब, मी प्रश्न विचारते की, काही जागांवर झाडे कापलेली आहेत. त्याची आपल्याकडे जर काही तक्रार आलेली असेल अशी काही प्रकरणे आहेत का?

**नागेश इरकर :-**

त्याच्यावर आम्ही एफ.आय.आर. दाखल केलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

काही विकासक झाडे कापून तिथे बिल्डींग बनवितात. त्याबाबत तुमच्याकडे काही अर्ज आलेले आहेत का? जे विकासक, बिल्डर असतात ते झाडे तोडतात आणि तिथे बिल्डींग बांधतात. माझ्या माहितीप्रमाणे माझ्या प्रभागात दोन-चार झाडे अशी कापलेली आहेत. त्याचे फोटोही माझ्याकडे आहेत. त्याच्यावर तुम्ही कारवाई करणार का? याबाबत तुम्हांला मी लेखी देतो. त्याच्यावर तुम्ही कारवाई करणार का?

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, मध्यंतरी मी स्वतः येथे प्रश्न उपस्थित केला होता. चौकच्या डोंगरावरची झाडे कापली. त्याच्यावर तुम्ही कारवाई केली का? अजूनपर्यंत त्याच्यावर कारवाई झालेली नाही. ती कारवाई का झाली नाही?

**प्रभात पाटील :-**

मघाशी रणखांब साहेबांनी आपल्या उत्तरामध्ये खुलासा केला की, असे जर झाड कोणा विकासकाकडून कापण्यांत आले तर.....

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ह्यामध्ये जर आमच्याकडे तक्रार प्राप्त झाली तर आम्ही निश्चितपणे कारवाई करु असे मी पुन्हा आश्वासन देतो.

**प्रभात पाटील :-**

साहेब, आपण ठोस आश्वासन दिले आहे. मी माझ्या येथील तक्रार केली नाही. पण माझ्या येथे रस्त्याचे पॅचवर्क करतांना आपल्याच एका ठेकेदाराने सात फुटाचे झाड पाडले, तेही पूर्णपणे मुळासकट आणि एवढे करुनसुद्धा चार दिवस ते झाड ठिकाणावर राहिले. नंतर पालिकेशी संपर्क साधून मी ते झाड उचलायला लावले. साडे सात ते आठ फुटाचे ते झाड मी माझ्या पहिल्या १९९१ च्या निवडणुकीत वृक्षारोपणाच्या वेळी लावले होते.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

कुठल्या ठेकेदाराने जर ते झाड पाडले असेल तर ती माहिती माझ्याकडे प्राप्त नव्हती.

**प्रभात पाटील :-**

याबाबत मी आपणांस आता सांगत आहे. मी याबाबत तक्रार केली नव्हती.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

अशी माहिती प्राप्त झाली आणि जरी तो ठेकेदार असला आणि जसा दुसरा मुद्दा सन्मा. सदस्या रिटा शाहजी ह्यांनी उपस्थित केला की, खाजगी प्रिमायसेसमध्ये झाड असेल व ते तोडायचे असेल तरीही वृक्षप्राधिकरणाची परवानगी आवश्यक आहे.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, माझा याबाबत एक प्रश्न आहे. उड्डाणपुलावरून येतांना उजवीकडे वळतांना टेम्बा हॉस्पीटलच्या येथे सध्याचे जे बांधकाम सुरु आहे. तिथे रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावण्यांत आलेली होती. परंतु सद्यपरिस्थितीत तिथे एकही झाड दिसत नाही. ती झाडे कुठे गेलीत?

**नागेश इरकर :-**

तिथे पुन्हा झाडे लावण्यांत येणार आहेत.

**केशव घरत :-**

तिथे लावलेली झाडे कुठे गेलीत?

**सुर्यकांत भोईर :-**

ते झाड लावले आहेत त्यांना तोडण्याची परवानगी तुम्ही दिलेली आहे का?

**केशव घरत :-**

तिथे लावलेली झाडे कुठे गेली? आपण ती झाडे लावली होती. आम्ही त्या रस्त्याने नेहमी ये-जा करतो आणि ते पाहिली आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

झाडे आता लावली नाहीत आणि ते तोडली आणि तुम्ही म्हणता झाडे तोडल्यानंतर तिथे परत लावणार.

**नागेश इरकर :-**

गटाराच्या ठिकाणी मनुभाई बिल्डर ह्या बिल्डरने झाडे दिलेली होती आणि ती तोडल्यामुळे तो पुन्हा तिथे झाडे लावण्याकरिता रोपे देणार आहे असे त्यांनी सांगितले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

ते झाड तोडतांना त्याने तुमची परवानगी घेतली का?

**गजानन भोईर :-**

त्यांनी तुमच्याकडून परवानगी घेतली का? आम्ही आता झाडे तोडतो व नंतर परत लावेन अशी लेखी परवानगी दिली आहे का? तर नाही.

**कैलासबेन जानी :-**

तिथे गटाराचे काम चालू आहे.

**प्रभात पाटील :-**

ही बाब गंभीर आहे की, नगरसेवक एकदम मोठ्या आत्मीयतेने तुमच्याकडे झाडांची मागणी करत आहेत. वृक्षारोपणाचे कार्यक्रम राबवितात. या शहराच्या विकासामध्ये किती सामाजिक संस्थादेखील काम करतात आणि लाखो रुपये खर्च करण्याकरिता देखील आम्ही परवानगी देतो आणि आपण कोणत्याही बिल्डरशी संगनमत करुन काहीही करुन.

**गजानन भोईर :-**

त्यांनी हात उचलून उत्तर देऊन मोकळे व्हायचे.

**प्रभात पाटील :-**

ते जगलेले जीव आपण मारतोय आणि पुन्हा पुन्हा आपण खर्चाला मंजु-याही मागतो. हा काय प्रकार आहे?

**मा. सभापती :-**

इरकरजी एकंदरीत आपण जे काम करता त्या कामाची जबाबदारी आपल्याला घेऊन ज्या पद्धतीने उत्तर द्यायला पाहिजे. तसे उत्तर आपल्याला देता येत नाही, हे असे एक तुमचे कारण आहे. दुसरी गोष्ट, ह्या शहरामध्ये किती झाडे तोडली? किती झाडे आहेत? असा तपशिल तुम्ही या ठिकाणी आणलात का? हे मला माहिती नाही. सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर आणि सन्मा. सदस्य केशव घरतजी ह्यांनी जो प्रश्न ह्या ठिकाणी उपस्थित केला या प्रश्नामध्ये सार्वजनिक बांधकाम खात्याकडून दोन्ही बाजूने गटाराचे काम सुरु केले आहे आणि ते गटाराचे काम सुरु करत असतांना जी झाडे विकासकर्ते मनुभाई ह्याने जी झाडे आपल्याला अगोदर दिली होती आणि त्यांनी ती झाडे आपल्याकडून लावून घेतली होती आणि जेव्हा रस्त्याच्या दुतर्फा गटाराचे काम नव्याने सुरु करण्यांत आले त्यावेळेला आयुक्त साहेबांना संपर्क साधून पी.डब्ल्यु.डी.ने ती झाडे त्या ठिकाणाहून काढून टाकण्यांत आलेली आहेत आणि पुन्हा ती झाडे मनुभाई विकासकर्ते हे आपल्याला ती झाडे पुन्हा लावण्याकरिता देणार आहेत आणि ती झाडे जी काढली गेलीत ती झाडे मिरा भाईंदर महानगरपालिकेने गटार बांधण्याकरिता आपण झाडे काढलेली आहेत असे उत्तर तुम्हांला देता येत नाही. असे तुम्ही जर उत्तर देऊ शकत नाही तर संपूर्ण हा वृक्षप्राधिकरणाचा कारभार तुम्ही कसा सांभाळणार? तुम्ही प्रॉपर उत्तर देत चला आणि त्याची प्रॉपर माहिती ठेवत चला.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, माझे म्हणणे असे. मग मनुभाईने झाड अगोदर का लावले? गटार अगोदर बांधून का घेतले नाही? आपले असे म्हणणे आहे की, जी झाडे लावली ती झाडे आपल्या

महापालिकेनेच लावलेलीच नव्हती. तुम्ही आता तसा उल्लेख केला की, मनुभाईने झाडे लावली आणि तो परत झाडे देणार आहे.

**प्रभात पाटील :-**

मनुभाईने जरी झाडे लावली असतील तरी मॅनपावर, खर्च महानगरपालिकेचा आहे. झाडे फक्त त्याने दिलेली आहे.

**मा. सभापती :-**

झाडे आपण काढलेली आहेत, झाडे विकासकर्त्याने काढलेली नाहीत. जे गटाराचे काम आहे ते गटाराचे काम मिरा भाईंदर महानगरपालिकेने गटाराचे काम सुरु केले आहे आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेने ती झाडे काढलेली आहेत.

**केशव घरत :-**

साहेब, माझा प्रश्न असा आहे, जर मनुभाईने झाडे दिली तर ती त्यांच्या जागेत लावायला पाहिजे होती. ती झाडे महापालिकेच्या जागेत का लावली?

**मा. सभापती :-**

विषय तो नाही.

**केशव घरत :-**

विषय तो नाही म्हणजे असा विषय बरोबर आहे की, नाही ते सागां?

**मा. सभापती :-**

एकेकाने प्रश्न विचारा तर उत्तर देता येईल.

**सुर्यकांत भोईर :-**

मनुभाईने काम चालू केल्यानंतर ही गटाराची कामे चालू झालेली आहेत. त्यापुर्वी गटार लाईन का चालू केली नाही.

**मा. सभापती :-**

त्यावेळेला गटाराचे काम मंजुर झाले नव्हते. त्याच्या अगोदर त्यांनी जी झाडे दिली ती झाडे आपण लावली होती आणि ही जी झाडे काढलेली आहेत ती झाडे कोणी काढलेली आहेत. ही झाडे विकासकर्त्यांनी काढलेली नाहीत. ही झाडे जेव्हा मिरा भाईंदर महानगरपालिकेला जेव्हा ज्या गोष्टीची आवश्यकता लागेल आणि ज्या विकासाच्या गोष्टी त्यांना करायच्या असतील तेव्हा ती झाडे काढण्यासाठी ती ऑथोरिटी सक्षम आहे. त्या ऑथोरिटीने झाडे काढण्यांत आली व तिथे आपण गटाराचे काम सुरु केले.

**सुर्यकांत भोईर :-**

माझ्या माहितीप्रमाणे ते गटार स्वतः विकासकर्त्याने केलेले आहे आणि ती झाडेही त्यानेच काढलेली आहेत. महापालिकेने ते फक्त टेंडर काढलेले आहे. पण ते काम केलेले आहे, विकासकाने. ते काम मुनभाईने केलेले आहे.

**केशव घरत :-**

साहेब, तिथे अगोदर कंम्पाऊंड वॉल होती.

**प्रभात पाटील :-**

याबाबत माहिती मागवा.

**सुर्यकांत भोईर :-**

मनुभाईच्या समोर जे गटाराचे काम चालले आहे ते गटाराचे काम मनुभाईने केलेले आहे व ती झाडे ही मनुभाईने काढलेली आहेत.

**कैलासबेन जानी :-**

ते गटाराचे काम केव्हा मंजुर करण्यांत आले होते?

**शिवाजी बारकुंड :-**

ते काम महानगरपालिकेने चालू केलेले आहे व महापालिकेने मंजुर केले आहे व त्यावर महापालिकाच काम करत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तिथे विकासकाचे ठेकेदार काम करत होते.

**शिवाजी बारकुंड :-**

ते जे गटाराचे काम चालू आहे ते महानगरपालिका ठेकेदारामार्फत चालू आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

मी तिथे काम करणाऱ्या कामगाराला विचारले, ''यह काम कौन कर रहा है?'' तर त्याने सांगितले की, बिल्डर काम करत आहे.

**मा. सभापती :-**

आपण ह्याची संपूर्ण चौकशी करुन घ्यावी. आपल्याला येथे उत्तर दिलेले आहे की, हे जे काम आहे ते मिरा भाईंदर महानगरपालिकेचे काम आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, एक आठवड्यापुर्वी मी स्वतःने विचारले होते की, हे काम कोणाचे चालू आहे? जेव्हा जे.सी.बी.ने झाडे तोडत होते. तेव्हा मला सांगितले की, हे काम बिल्डर करत आहे. जर ते काम ठेकेदार करत असेल तर त्याने त्या ठेकेदाराचे नांव घेतले असते की, हा ठेकेदार काम करत आहे असे.

**मा. सभापती :-**

आपल्याला जी माहिती दिलेली आहे त्या माहितीप्रमाणे आपणांस खुलासा करण्यांत आलेला आहे. ते गटाराचे काम मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आहे.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, ह्याचा अर्थ बांधकाम विभाग, आरोग्य विभाग आणि वनखाते ह्यांचा एकमेकांशी संपर्क नाही असे दिसते. त्यामुळे हा प्रॉब्लेम झाला.

**गजानन भोईर :-**

याबाबत पी.डब्ल्यु.डी.चा खुलासा मागवा.

**सुर्यकांत भोईर :-**

पण त्याने महापालिकेचा ठेकेदार काम करत असेल तर हा ठेकेदार काम करतो म्हणून सांगितले असते.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईरजी आपल्याला उत्तर दिले की, ते काम गटाराचे मिरा भाईंदर महानगरपालिका करते आणि आपल्याला जर ह्याच्यावरही आणखीन काही सांगायचे असेल तर आपण तसे पुरावे सादर करावे मग आपण त्याच्यावर ॲक्शन घेऊ.

**सुर्यकांत भोईर :-**

मी स्वतः पुरावा आहे. मी स्वतः तिथे विचारले की, हे काम कोण करतो? तर बिल्डर करतो असे सांगितले. ह्याचा अर्थ काय? पुरावा काय, मी स्वतः विचारले म्हणजे मी पुरावा नाही का?

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका ते काम करते आणि त्या कामाचे टेंडर काढलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, बरोबर आहे. तिथे जो ठेकेदार होता त्याने सांगायला पाहिजे होते की, मिरा भाईंदर महानगरपालिका हे गटार बनविते. आम्ही ठेका घेतलेला आहे. पण तो सांगतांना मला सांगतो की, हे काम बिल्डर करतोय.

**मा. सभापती :-**

ह्याचा अर्थ त्याने आपल्याला चुकीची माहिती दिलेली आहे आणि आता आपण ह्याची माहिती घेतली ना? आणि जर ते काम बिल्डर करत असता तर आपले पैसे वाचले असते.

**केशव घरत :-**

साहेब, एकीकडचे मनुभाईचे आहे. जे त्याने घेतले आहे आणि दुसरीकडचे, समोरच्या बाजूचे जे आहे. तर दोन्हीकडच्या बाजूची झाडे काढलेली आहेत. पहिल्यांदा दोन्हीकडे झाडे लावलेली होती.

**मा. सभापती :-**

बारकुंडजी, कोणत्या गटाराचे काम चालू आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

दोन्ही बाजूच्या गटाराचे काम चालू आहे.

**अशोक पाटील :-**

ह्याचा ठेकेदार कोण आहे?

**सुर्यकांत भोईर :-**

आपण ठेकेदाराचे नांव सांगू शकता का?

**दिपक खांबित :-**

याबाबत आम्ही आपल्याला लेखी माहिती देऊ.

**सुर्यकांत भोईर :-**

मी जेव्हा स्वतः तिथे प्रत्यक्ष विचारले तेव्हा तिथे तो ठेकेदार मला बोलला की, बिल्डर काम करतोय. आपण मला त्या ठेकेदाराचे नांव द्या.

**रिटा शाह :-**

आपल्याला ठेकेदाराचे नांव द्यायला भीती वाटते का?

**अशोक पाटील :-**

सभागृहाच्या निदर्शनात एक गोष्ट आणू देऊ इच्छितो की, आपल्या डिपार्टमेंन्टचे, मग ते आरोग्य असू दे, बांधकाम विभाग असू दे किंवा वन विभाग असू दे, ह्यांचा एकमेकांशी समन्वय नसल्यामुळे हा प्रॉब्लेम उपस्थित होतो. आता वनखात्याने झाडे लावली. त्याने डेमॉक्रेशन बघितली नाही की, ते झाड येथे रस्त्यात येणार आहे. मार्जिन का येथे गटाराजवळ येणार आहे आणि नंतर ते झाड काढायचे. ह्याच्यामुळे त्यांनी त्यांच्याशी समन्वय साधायला पाहिजे की, तुमची गटाराची डेमॉक्रेशन कुठे आहे? आणि मग वनखात्याने झाडे लावायला पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

वनखात्याच्या अधिका-याला काहीही माहिती नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

निर्णय कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराला दिले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

त्या ठेकेदाराच्या मालकाचे नांव काय आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

नाना हे नांव आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

ठिक आहे.

**केशव घरत :-**

नानाने सगळे काम चालते का? गुरुजी कन्स्ट्रक्शनने पुर्ण महापालिकेने काम घेतले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

नानाला संपूर्ण महानगरपालिकेचे ठेके द्यायचे असे लिहून दिले आहे का?

**गजानन भोईर :-**

म्हणजे एखाद्याने संपूर्ण टेंडर घ्यावे. जसे ज्याचे केस कापण्यापासून ते कपडे शिवण्यापर्यंत. आपण जो पी.डब्ल्यु.डी.चा उल्लेख केला की, पी.डब्ल्यु.डी.ची परवानगी म्हणजे नक्की काय ते समजले नाही. ह्या रोडची झाडे काढतांना आपण पी.डब्ल्यु.डी.ची परवानगी घेतली असे तुम्ही बोललात.

**मा. सभापती :-**

पी.डब्ल्यु.डी. म्हणजे आपले सार्वजनिक बांधकाम खाते आहे त्याला पी.डब्ल्यु.डी. म्हणतात.

**कैलासबेन जानी :-**

आता सध्या जे गटाराचे काम चालू आहे ते काम केव्हा पास झाले आहे?

**मा. सभापती :-**

ह्याची माहिती आपणांस नंतर देण्यांत येईल.

**प्रभात पाटील :-**

त्या बिल्डरने आपणांस झाडे दिली आणि ती झाडे आपण लावली. म्हणजे शेवटी त्याने रोपे केवढ्याची दिली आणि आपण तिथे मॅन पावर आणि पैसा खर्च केला आणि पुन्हा आपणच ती झाडे काढली. झाडे काढायला खर्च झाला, लावायला खर्च झाला, म्हणजे आपले खाते हे प्लसमध्ये काम करते की मायनसमध्ये काम करते.

**सुर्यकांत भोईर :-**

महापालिका हे फक्त मायनसमध्येच काम करत आहे.

**प्रभात पाटील :-**

मायनसमध्येच आहे हे काम.

**गजानन भोईर :-**

म्हणजे एखाद्याने झाड तोडले तर तो सांगेल की, मी झाड लावेन असे. मग आपण कार्यवाही करायची तर कोणावर करायची?

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, या अधिका-याला अजून मिरा भाईंदर महानगरपालिकेची काही माहिती नाही.

**प्रभात पाटील :-**

झाड किती स्वत येते आणि त्याला लावणा-यालाच खर्च जास्त येतोय. खत, माती आणि पिंजरे आणि नंतर वरुन ते झाड कापायचे.

**सुर्यकांत भोईर :-**

सृष्टीमध्ये झाडांची छाटणी करण्याकरिता मी पत्र दिले होते. कमीत कमी गणपतीच्या अगोदर पण अजूनपर्यंत छाटणी झालेली नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांनी या ठिकाणी वृक्षारोपणाबद्दल आणि झाडे लावण्याबद्दल आपल्या ब-याच प्रतिक्रिया या ठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत. इरकरजी मी तुम्हांला सांगतो की, अधिकारी या नात्याने जी माहिती द्यायला पाहिजे ती माहिती या ठिकाणी देतांना आपल्याजवळ माहिती असूनही माहिती देता येत नाही. या पद्धतीचे आपल्याला येथे चित्र दिसत आहे. परंतु, जे सन्मा. सदस्य अशोक पाटील ह्यांनी सांगितले की, जो समन्वय साधला पाहिजे आणि बारकुंडजी जेव्हा पी.डब्ल्यु.डी.कडून आपली कामे चालतात तर अशा ठिकाणची झाडे असतील तर तशी माहिती आपण वृक्षप्राधिकरणाला दिली पाहिजे. कारण या ठिकाणी आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेची वृक्षप्राधिकरण समिती आहे आणि ह्या समितीला ह्याबद्दल ब-याचशा पावर्स आहेत आणि त्यांच्याकडे बरेचसे अधिकार आहे आणि त्यांच्या अधिकारामध्ये या ठिकाणी कामे चालतात. परंतु, तशी जर माहिती आपल्याकडे उपलब्ध असेल, आपल्याला माहिती द्यायची असेल तर आपण वृक्षप्राधिकरणाचे जे सदस्य आहेत त्याचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून मा. आयुक्त असतात. तशी आपली काही माहिती असेल तर ती माहिती आपण वृक्षप्राधिकरणाला द्यावी आणि पुढच्या वेळेला ज्या पद्धतीने मुख्यालय आयुक्त आपल्याला सांगू इच्छितो की, सन्मा. सदस्यांनी जी माहिती आपल्याकडून मागविलेली आहे. त्या माहितीचा आढावा घेऊन तशा पद्धतीची माहिती आपण या ठिकाणी ठेवावे व तसे पत्र आपण वृक्ष प्राधिकरण समितीला देण्यांत यावे.

**अशोक पाटील :-**

आपल्या महापालिकेच्या ठेकेदाराकडून किती वृक्ष लावण्यांत आलेले आहे आणि खाजगी विकासकाने वृक्ष दिलेले असतील, जसे आता मनुभाईचा उल्लेख केला. तर याबाबत देखील वेगळी माहिती उपलब्ध व्हावी.

**मा. सभापती :-**

आपल्या खाजगी विकासकर्त्याने किंवा खाजगी संस्थेने आपल्याला झाडे दिलेली आहेत. ती माहिती देखील आपण या ठिकाणी द्यावी आणि तुम्हांला मी मागच्या वेळी देखील बोललो होतो की, ज्या ठिकाणी आपण हॉकर्स बसवितो त्यांनी आपली झाडे काढलेली आहेत. आपण त्यावर ॲक्शन घेतली नाही. जर आपण ती ॲक्शन घेतली नाही तर आम्हांला तुमच्यावर ॲक्शन घ्यायला लागेल अशी परिस्थिती निर्माण करु नका.

**प्रभात पाटील :-**

ठराव मांडला का?

**मा. सभापती :-**

आपण ठराव मांडा.

**कैलासबेन जानी :-**

हा विषय आपण पुढच्या वेळी घ्या.

**सुर्यकांत भोईर :-**

हा विषय पुढे येऊ द्या. आपण ठराव कशाला मांडता?

**मा. सभापती :-**

हा देकाराचा विषय आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

ह्याची संपूर्ण माहिती येऊ द्या. त्या अधिका-याला ह्याची संपूर्ण माहिती नाही आणि आपण ठराव मांडता, तर कशाला ठराव मांडता?

**अशोक पाटील :-**

भोईर साहेब, आपण ह्याची एजन्सी नेमतोय. अधिका-यांना काहीच माहिती नाही. मघाशी रणखांब साहेबांनी ह्याची माहिती दिली की, सक्षम एजन्सीकडून काम करुन घेणार.

**प्रभात पाटील :-**

या विषयाच्या संदर्भामध्ये पाटील साहेब, मी आपल्याला सांगू इच्छिते की, माणसाची माणुसकी जोपासण्या इतपत आपण ज्या पद्धतीने एखाद्या माणसाला वाचवू इच्छितो. त्या पद्धतीने ती झाडे वाचविण्याच्या प्रकारात सदस्यांच्या भावना तीव्र आहेत आणि वृक्षप्राधिकरण समितीचे जे येथे अधिकारी आहेत त्यांना नगरसेवकांच्या एकाही प्रश्नाचे उत्तर देता आले नाही. ह्या विषया संदर्भात मी आपणांला एवढे सांगू इच्छिते की, आपण ज्या खाजगी विकासकाकडून हे वृक्षारोपण करतो आणि त्यात किती झाडे लावली गेली? किती जगली? किती त्याला आपण देय देणगी दिल्या, ज्या त्याला देण्याइतपत होत्या? आणि किती बाकी आहे? खाजगी विकासकाने आपल्या आवारामध्ये म्हणजे मिरा भाईंदर परिसरामध्ये किती झाडे लावली? किती जगली? ह्या संपूर्ण प्रश्नांची उत्तरे ह्या सभागृहाला येथे मिळाली पाहिजे. पुढे येणारा विषय हा केवळ त्या संदर्भात असेल. पण मात्र आजचा जो विषय येथे आलेला आहे की, वृक्षगणना करणे हे जर आपल्याला कायदेशीर बंधनकारक आहे तर मला असे वाटते की, बाकीची माहिती पुढच्या सभेत देण्यांत येईल असे गृहीत धरुन या विषयाला मान्यता द्यावी असे मला वाटते आणि त्यानुसार मी ठराव मांडते.

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, महत्वाचा एक शब्द त्याच्यात ॲड करुन घ्या की, कार्पोरेशनने लावलेली झाडे आणि खाजगी ठेकेदाराने लावलेली झाडे ते दोन्ही बघा.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, ठरावात तसे नमुद करुन घ्या की, जी एजन्सी तुम्ही नेमणार आहात तर सक्षम एजन्सी कडूनच त्या निविदा मागविल्या जाव्यात की, ज्यांना ह्या बद्दलची पुर्ण माहिती आहे. नाही तर, येथे ठोसपणे बांधकाम विभागाचा ठेकेदारही टेंडर भरतो.

**गजानन भोईर :-**

नाही तर, आपल्याजवळ गुरुजी कन्स्ट्रक्शन आहे ना?

**प्रभात पाटील :-**

ही निविदा आपल्यासमोर यावी.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांनी ज्या सुचना मांडल्या आहेत त्या सुचना धरुन आणि या ठिकाणी ठाणे महानगरपालिका किंवा अन्य महानगरपालिकेने अशा पद्धतीने जी वृक्षगणना केलेली आहे त्याचा आधार घेऊन त्याची माहिती घेऊन आपण पुढील कार्यवाही करावी.

**प्रकरण क्र. ९५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्षांची गणना करणेबाबत.

**ठराव क्र. १०४ :-**

महानगरपालिकेच्या विस्तीर्ण ७९ चौ.कि.मी. पसरलेल्या मोठ्या प्रमाणावर डोंगराळ भाग आहे. जसे घोडबंदर, चेणा, वर्सोवा, उत्तन, डोंगरी, चवळी, इ. ठिकाणी सरकारी जागेवर महानगरपालिकेने मोठ्या प्रमाणावर गट लागवड केलेली असून सदर डोंगराळ भागात पुर्वीची सुद्धा झाडे आहेत. तसेच महानगरपालिका परिसरात विविध रस्त्याचे दुतर्फा झाडे लावण्यांत आलेली असून विविध खाजगी गृहनिर्माण संस्थांच्या आवारात तसेच शाळा, कॉलेजेस, दवाखाने, मैदाने इ. ठिकाणी सुद्धा मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड झालेली आहे. परंतु तत्कालिन नगरपालिका स्थापनेनुसार डिसेंबर ९६ पर्यंत एकदा व त्यानंतर प्रत्येक पाच वर्षांनी एकदा वृक्षगणना करणे आवश्यक होते. परंतु अद्याप पर्यंत मिरा भाईंदर परिसरात एकूण किती वृक्ष आहेत, कोणत्या प्रकारचे आहेत याबाबत गणना केलेली नाही. त्यामुळे नेमके किती वृक्ष आहेत व त्यांचे प्रकार कोणते याबाबत माहिती महानगरपालिका जवळ उपलब्ध नाही. त्यामुळे सदर माहिती मिळणेसाठी महाराष्ट्र (नागरीक्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे प्रकरण चार कलम ७(ख) अंतर्गत तरतुदीनुसार डिसेंबर १९९६ नंतर प्रत्येक पाच वर्षातून एकदा वृक्ष प्राधिकरणाने त्यांच्या परिसरातील सर्व जमिनीवरील विद्यमान झाडांची गणना करणे बंधनकारक आहे.

तथापि वृक्षगणनेकरिता येणारा खर्च वृक्षरोपण कार्यक्रम या लेखाशिर्षाखाली भागविण्यांत येणार असल्याने अधिनियमातील तरतुदनुसार महानगरपालिका परिसरातील सर्व जमिनीवरील विद्यमान झाडांची गणना करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना झाडांचे प्रकाराबाबत पूर्ण ज्ञान अवगत नसल्याने कर्मचाऱ्यांमार्फत गणना करणे शक्य होणार नाही. तसेच सदर काम हे कालमर्यादेत व तातडीने पूर्ण करावयाचे असून काम महानगरपालिकेच्या वॉर्ड निहाय केल्यामुळे प्रत्येक वॉर्डात किती

वृक्ष आहेत त्यांचे प्रकार वय, उंची, आकारमान, त्यांचे विषयी शास्त्रीय महत्व आदी बाबत माहिती स्वतंत्ररित्या मिळू शकेल. तसेच भविष्यात झाडांचा संदर्भ व संशोधन याकरिता सुद्धा उपयोग होणार आहे.

महानगरपालिका परिसरातील शासकीय, खाजगी व महानगरपालिकेच्या स्वतःचे जागेवरील वृक्षांची गणना करण्याचे दृष्टिने वृक्षप्राधिकरण समिती सभा दि. २६/०७/२००४ ठराव क्र. ५ अन्वये केलेल्या शिफारशीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरात सुमारे दोन ते अडीच लाख झाडे असून त्यांची गणना करण्यासाठी रु. १०,००,०००/- पर्यंत (अक्षरी रु. दहा लाख मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च अर्थसंकल्पातील वृक्षारोपण लेखाशिर्षाखाली ठेवलेल्या रु. १.१५ कोटीचे तरतूदीमधून भागविण्यांत येणार आहे. याकामी जाहिर वृत्तपत्रातून वृक्षगणना करणाऱ्या इच्छूक संस्थेकडून निविदा मागवनू घेणेस व याकामी येणारे देयक अदा करणेस मा. स्थायी समितीची मंजूरी आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९६ चे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

एकाही खर्चाला मंजुरी देण्यांत येऊ नये. कारण सगळ्यांना बोजवारा एवढा वाढलेला आहे.

**कैलासबेन जानी :-**

वीस लाखाची तरतुद होती त्याच्यापैकी किती लोकांचे पेमेन्ट बाकी आहे व ते खातेदार कोण कोण आहेत?

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, जे आरोग्य केंन्द्र चालली जातात. त्याचे एकंदरीत ढोबळपणा अहवाल सादर करा की, कशा पद्धतीने कामकाज चालते. आज नागरिकांना व्यवस्थित सुविधा मिळते का नाही?

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापती महोदय, मा. अशोक पाटील साहेब ह्यांनी जी सुचना मांडलेली आहे तर माझी आपणा सर्वांना एक विनंती आहे की, आपणच एकदा प्रत्येक आरोग्य केंन्द्राला भेट द्यावी आणि त्याची पाहणी करावी. मी तर अहवाल तयार करुन पुढच्या सभेला सभा सुरु होण्याच्या तत्पुर्वी मी आपल्याला देईल. आरोग्य केंद्राचा कारभार कसा चालतो? प्रत्येक महिन्याला, प्रत्येक आरोग्य केंद्रामध्ये किती पेशन्ट आले, किती पेशंटवर आपले औषधोपचार झाले आहेत आणि आतापर्यंत किती रुग्णांवर आपण औषधोपचार केले. याबद्दल मी आपल्याला सर्व लेखी माहिती देईन आणि आपण ही जर तयारी दर्शविली तर आपण त्या आरोग्य केंद्राला भेट देऊ शकतो. आपल्याला मी केव्हाही आरोग्य केंद्रावर घेऊन जाईन. आपला जो प्रश्न आहे ह्याच्यात जानेवारी महिन्यामध्ये २६ जानेवारीला आपण पहिले आरोग्य केंद्र सुरु केले. आरोग्य केंद्र सुरु करण्यापुर्वी नक्की किती प्रतिसाद मिळणार आहे आणि किती रुपयाची औषधे आपल्याला लागणार आहेत? ह्याची कुठलीही कल्पना नव्हती. आरोग्य केंद्र आता सहा कार्यरत आहे आणि एक फिरता दवाखाना कार्यरत आहे. ह्या दवाखान्यासाठी जी औषधे होती त्यासाठी आपण जानेवारी महिन्यामध्ये जी निविदा मंजुर झाली होती त्या मंजुरीला आपण २० लाखाच्या खर्चाची मंजुरी घेतली होती. फक्त एक अंदाजित रक्कम म्हणून कुठलीही कल्पना नव्हती की, आपल्याला प्रतिसाद किती मिळणार? रुग्ण किती येणार? म्हणून वीस लाखाला मंजुरी घेतली होती आणि आपल्या माहितीसाठी सांगातो की, अतिशय चांगला प्रतिसाद आपल्या नागरिकांकडून ह्या आरोग्य केंद्राला लाभलेला आहे. दररोज जवळ जवळ ॲव्हरेज म्हणजे सरासरी एखाद्या महिन्यामध्ये कमी जास्त होऊ शकते. परंतु, दररोज सातशे ते आठशे रुग्ण या आरोग्य केंद्रामार्फत उपचारासाठी येतात आणि त्याचा लाभ घेतात आणि त्यामुळे औषधांची जी आपली तरतुद आहे. परंतु, स्थायी समितीने खर्चाला जेवढी मंजुरी दिलेली आहे ती संपलेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण रुग्णांकडून काही फी घेता की नाही?

**डॉ. बावस्कर :-**

रुग्णांकडून आपण मा. महासभेच्या ठरावानुसार प्रत्येक रुग्णाकडून एका केस पेपरसाठी आपण एका वेळेला पाच रुपये घेतो.

**कैलासबेन जानी :-**

दुसऱ्या दिवशी तो माणूस परत आला तरीसुद्धा आपण त्याच्याकडून परत पाच रुपये घेणार?

**डॉ. बावस्कर :-**

दुसऱ्या दिवशी त्या माणसाला यायची गरज पडते आणि आपण साधारणतः तीन ते चार दिवसाचे औषध आवश्यकतेनुसार देतो आणि ती औषधे संपल्यानंतर परत पेशन्ट आला तर आपण परत पाच रुपये घेतो. प्रत्येक वेळेला पेशन्ट येईल कारण औषधे आपण ट्रिपल क्लॉजेस औषध आपण पंधरा दिवसांची देतो, महिन्याभराची देतो. त्यासाठी सुद्धा एका वेळेला आपण पाच रुपये घेतो. एखाद्या आजारासाठी जर दोन दिवसांचे औषध असेल तर तिसऱ्या दिवशी जर गरज पडत असेल तर त्याचे पाच रुपये आपण परत घेतो.

**कैलासबेन जानी :-**

ह्याच्यामध्ये आपल्याला महिन्याला कधी फायदा होतो?

**जोजफ घोन्सालवीस :-**

जरी आपण पाच लाख रुपये पकडले तरी महिन्याला एक लाख रुपये एवढा फायदा होतो का? जमेमध्ये आपण काय रक्कम दाखविली का?

**डॉ. बावस्कर :-**

माझ्या अहवालामध्ये आपल्याला संपूर्ण इन्कम देतो. लेखा विभागात किती पैसे जमा केलेले आहेत ह्याची सर्व माहिती आपल्याला पाहिजे असल्यास देतो.

**सुर्यकांत भोईर :-**

त्याचा अहवाल आम्हांला कधी मिळेल.

**अशोक पाटील :-**

आपण ज्या पद्धतीने फिरता दवाखाना चालवतो त्या पद्धतीने एखादी झोपडपट्टी विभागामध्ये जर जागेची सोय असेल तर तिथे आरोग्य केंद्रामार्फत दवाखाना सुरु करता येईल का?

**डॉ. बावस्कर :-**

होय, चालविता येईल. पण त्याची मा. महासभेमध्ये धोरणात्मक बाब म्हणून कारण आता एक वर्ष झालेले आहे.

**मा. सभापती :-**

आपण धोरणात्मक बाब म्हणून आपण आरोग्याची केंद्रे द्यावीत असे आपले धोरण ठरलेले आहे. जर अशा जागेची उपलब्धता आपल्याकडे असेल, संपूर्ण झोपडपट्टी मिळून व तिथे जागेचा विवाद नसेल. कारण काही जागा झोपडपट्टीमध्ये सेंट्रल गव्हर्नमेंट असा प्रकार आहे.

**अशोक पाटील :-**

आपल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेमध्ये.

**मा. सभापती :-**

होय, आपण करु शकतो.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, म्हणजे एखादा समाजमंदिर असेल महापालिकेचे तर त्या ठिकाणी.......

**मा. सभापती :-**

त्या ठिकाणी करता येईल.

**अशोक पाटील :-**

त्याच्यासाठी महानगरपालिकेच्या परवानगीची आवश्यकता आहे का?

**मा. सभापती :-**

तशी आवश्यकता नाही. आपण करु शकतो.

**कैलासबेन जानी :-**

ह्यात कुणाचे पेमेन्ट बाकी आहे का?

**डॉ. बावस्कर :-**

निविदाकारांच्या काही बिलाचे पेमेन्ट बाकी आहे. ते आपल्या चुकीमुळे नाही. त्यांनी काही कागदपत्रांची पुर्तता केली नाही त्याच्यामुळे पेमेन्ट राहिलेले आहे.

**कैलासबेन जानी :-**

किती पेमेन्ट बाकी आहे?

**डॉ. बावस्कर :-**

साधारणतः सात ते नऊ लाखाचे पेमेन्ट राहिलेल आहे. परंतु, त्यामध्ये आपल्याल जे औषधांचा टेस्ट रिपोर्ट लागतात. काही औषधांचे अजून टेस्ट रिपोर्ट आलेले नाही त्यांच्याकडून व त्यांना तसे कळविलेले आहे व त्यांना वारंवार सांगितले आहे की, टेस्ट रिपोर्ट द्या. त्यांनी सांगितले की, ह्या चार पाच दिवसांत तसे टेस्ट रिपोर्ट देतो. त्यांचे बिल पूर्ण तयार आहे व तसे बिल पाठवलेले आहे. सगळे बिल तपासून तयार आहेत. फक्त टेस्ट रिपोर्ट आल्यानंतर त्याचे पेमेन्ट देण्यांत येईल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

दोन महिन्यापासून औषधे नाहीत का?

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, माझ्या वॉर्डामध्ये तसे एक समाजमंदिर आहे आणि तिथे दवाखान्याची आवश्यकता आहे. मी तुम्हांला जागा दाखवतो व पत्र देतो आपण त्याची पाहणी करुन घ्यावी.

**डॉ. बावस्कर :-**

मी जागा बघून घेतो.

**कैलासबेन जानी :-**

दवाखान्यात तुम्ही असे बोर्ड लावलेले आहे की, आठ ते दहा, दहा ते बारा ते चारपर्यंत कसे काय बोर्ड लावलेले आहे?

**डॉ. बावस्कर :-**

दवाखान्याची वेळ साधारणतः सकाळी दवाखान्याचे तसे साडे आठ वाजल्यापासून सुरु होते पण रुग्णांसाठी आम्ही नऊ वाजता सुरु करतो. नऊ ते चार अशी दवाखान्याची वेळ असते आणि आरोग्य केंद्राची वेळ ९ ते १२ किंवा १२.३० पर्यंत. बाह्यरुग्ण म्हणजे आऊट पेशन्ट ओ.पी.डी.ची आपली व्यवस्था असते आणि त्याच्यानंतर जे फिल्डमध्ये काम करायचे आहे, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाचे त्या फिल्डच्या कामांचा आढावा घेणे, त्याचा रिपोर्ट तयार करणे, शासनाला वेळोवेळी दर आठवड्याला आपण कार्यक्रमाचे रिपोर्ट पाठवावे लागतात. ते सगळे काम दुपारच्या वेळेत त्यांना दररोज करावे लागते.

**कैलासबेन जानी :-**

आपण तसा बोर्ड लावा की, दहा ते चार असे.

**डॉ. बावस्कर :-**

मग चार वाजेपर्यंत पेशन्ट येतील आणि जर डॉक्टर कुठल्या एरियामध्ये फिल्डमध्ये गेले तर ते पेशन्ट बघू शकणार नाही.

**रिटा शाह :-**

त्यांना असे बोलायचे आहे की, तुम्ही जो काही शेड्युल नक्की केला आहे त्याचे बोर्ड लावावे.

**डॉ. बावस्कर :-**

ठिक आहे. तसे बोर्ड लावण्यांत येतील.

**प्रभात पाटील :-**

आपल्या प्राथमिक आरोग्य केंद्राला इतका चांगला प्रतिसाद आहे. कारण खाजगी चांगले आहे, माझा रेसीडेन्स एरिया आहे तिथे इमारतींमध्ये राहणारे सगळे लोक श्रीमंत आहेत अशातला भाग नाही आहे. तर त्यातल्या त्यात सुद्धा लोक बायका मुलांना घेऊन ह्या आरोग्य केंद्रात जातात की, ''हमको पाच रुपये मे इतनी अच्छी दवाई मिलती है, और मुझे अच्छा लगा। मेरा बच्चा अच्छा हो गया।'' अशा तऱ्हेचा प्रतिसाद लोकांचा आहे. एक चांगली बाब आपण येथे सुरु केलेली आहे आणि म्हणून तुम्ही जे म्हणता की, चार नंतर आम्हांला ही कामे असतात. पण कधी कधी एखादा मुलगा पडतो, आदळतो, कोणाला रिक्षाने ठोकले जाते आणि त्याच वेळेला नेमके अशी गंभीर स्वरुपाची दुखापत असते की, त्यांना खाजगी इस्पितळांत घेऊन जावे लागते. अशा वेळेला आरोग्य केंद्रामध्ये आपला एक डॉक्टर अवेळीसुद्धा असणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने सुद्धा आपल्याला ते उपाययोजना करता आली पाहिजे.

**डॉ. बावस्कर :-**

उपाय योजना करता येतील यासाठी आपल्याला काही प्रमाणात सध्या एका आरोग्य केंद्रासाठी एकच वैद्यकीय अधिकाऱ्याची नेमणुक आपण केलेली आहे आणि शासनाचे जे प्राथमिक आरोग्य केंद्र असतात त्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये साधारणतः दोन आरोग्य केंद्र वैद्यकिय अधिकाऱ्याची आणि

दोन मेडिकल ऑफीसरची अपॉईन्टमेंट असते आणि त्याचा स्टाफसुद्धा मोठ्या प्रमाणात असतो. एका प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये १६ ते १८ पर्यंत जी मोठी प्राथमिक आरोग्य केंद्र जी आता भाईंदर प्राथमिक आरोग्य केंद्र त्या ठिकाणी जवळ जवळ १६ ते १८ कर्मचाऱ्यांची नेमणुक आपण केलेली असते. आपण फक्त ४ ते ५ कर्मचाऱ्यांना आपला प्रतिसाद कसा लागतो. आपल्याला कसा रिस्पॉन्स मिळतो. कारण आतापर्यंत आपल्याकडे अशा सुविधा नव्हत्या. त्या केल्या. आता आपल्याला जो अनुभव आलेला आहे त्यावरुन आपल्याला एखादा डायग्नोस्टीक सेंटर, एक्सरे, पॅथोलॉजी. कारण आपल्या आरोग्य केंद्राला सपोर्टींग सिस्टम आपल्याला सुरु करावी लागेल. पॅथोलॉजी एक्सरे आणि एखादे आपण म्हणता तसे सेंटर ज्या ठिकाणी भाईंदर पुर्वेला एक, पश्चिमेला एक, मिरा रोड येथे एक किंवा काशीमिराच्या एरियामध्ये आणि उत्तन परिसरात एक असे आपल्याला छोटे छोटे सेंटर सुरु करुन त्या ठिकाणी साधारणतः दिवसभराच्या सकाळी ८.०० ते संध्याकाळी ८.०० पर्यंत आपल्याला अशा प्रकारची सुविधा उपलब्ध करुन देता येऊ शकेल. त्यासाठी मा. महासभेला मी प्रस्ताव सादर करतो आणि त्यांची मंजुरी मिळाल्यानंतर त्याच्यावर आपल्याला कार्यवाही करता येईल.

**प्रभात पाटील :-**

त्या प्रस्तावामध्ये मी मागच्या जेव्हा गेल्या वर्षी आपण ह्या विषयाला संमती घेतली प्राथमिक आरोग्य केंद्र चालवायला. तर मी तेव्हाही उल्लेख केला होता आणि आज ही मा. स्थायी अध्यक्ष महोदय, मी आपल्याला सांगते की, डॉक्टर साहेब जो प्रस्ताव सादर करणार आहेत त्याच्यामध्ये बोलले होते की, भाईंदर पुर्व किंवा पश्चिम किमान पाच खाटांचे एक प्रसुतीगृहाला आपण मंजुरी द्या. कारण आजचा हा जो खर्च आहे सर्वसामान्य लोकांना अजिबात परवडणारा नाही आणि ह्या प्राथमिक तत्त्वांवर पाच खाटा आपण कुठेतरी उपलब्ध करा की, घरच्या पुरुष मंडळींना बिल भरतांना अगदी नाकी नऊ आलेले आहे.

**डॉ. बावस्कर :-**

आपल्या प्रश्नाचे उत्तर देतोय. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण तीन प्रसुतीगृह आणि बाल रुग्णालय म्हणजे माता व बाल रुग्णालय सुरु करण्याचा प्रस्ताव आपण घेतलेला आहे. याचा खर्च आपण न करता आपण शासनाला पाच वर्षाकरिता हा कार्यक्रम दिलेला आहे आणि शासनाकडे प्रयत्न करुन रिप्रोडक्टीव्ह ऑफ चाईल्ड ह्या केंद्रशासनाच्या कार्यक्रमा अंतर्गत आपण जवळ जवळ पाच करिता एकूण सहा ते सव्वा सहा कोटींचा प्रस्ताव शासनाला दिलेला आहे आणि येथे सांगताना आनंद होतो की, तो प्रस्ताव मंजुर झालेला आहे. बहुतेक एप्रिलपासून आपल्याला त्याची मंजुरी मिळेल किंवा त्याची कार्यवाही करता येईल. त्या प्रस्तावामध्ये पाच वर्षासाठी आपल्या विभागात एकूण जवळ जवळ सात ते आठ आणखीन आरोग्य केंद्रे ते शासनाच्या खर्चाने येणार आहे आणि असे तीन हॉस्पीटल हे शासकीय खर्चातून आपल्याला चालणार आहेत. त्याच्यानंतर आपल्याला पाच वर्षानंतर ही आरोग्य केंद्रे कारण आपली लोकसंख्या जशी आता वाढते तशी काही प्रमाणात वाढलेली असेल. पाच वर्षानंतर ही आरोग्य केंद्रे व प्रसुतीगृह आपल्याला चालवायची आहेत आणि तसा प्रस्ताव आपण सादर केलेला आहे. त्यामुळे बहुतेक एप्रिल पासून या तीन प्रसुतीगृहासाठी आणि आणखीन सात ते आठ आरोग्य केंद्रासाठी शासनाकडून अनुदानासहित मंजुरी मिळणार आहे आणि मंजुरी मिळाल्यानंतर आपण आत्ताच त्या कार्यवाहीला सुरुवात केलेली आहे आणि जागा शोधण्याचा आपण प्रयत्न करत आहोत आणि भाईंदर पुर्व, भाईंदर पश्चिम, काशीमिरा, मिरा रोड आणि उत्तन या विभागांमध्ये आपल्याला प्रसुतीगृह सुरु करायचे आहेत. त्यासाठीचा प्रस्ताव पुन्हा आपल्या स्थायी समितीमध्ये मंजुरीसाठी येईल.

**रिटा शाह :-**

साहेब, आपण जो प्रस्ताव दिलेला आहे ह्याच्यात आपण असाही प्रस्ताव करा की, कारण येथे मध्यमवर्गीय परिवार जास्त आहेत, मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये तर आपण पॅथोलॉजीकल लॅब आणि एक्सरे मशीन ह्यांची सुविधा आपण केली, किमान दराने मोफतमध्ये नाही तरी येथे गरीबांना सहकार्य होईल.

**डॉ. बावस्कर :-**

ह्या प्रस्तावानंतर नो प्रॉफीट नो लॉस बेसीसवर किमान आपण अशा सेवा उपलब्ध करुन देऊ. त्यात एक्सरे आहे, पॅथोलॉजी आहे, म्हणजे रक्त आणि लघवीच्या तपासणीची सोय आहे आणि आज या ठिकाणी जो प्रस्ताव सादर केलेले आहे त्यात सुरुवातीला आम्हांला साधारणपणे दोन एक लाखापर्यंत वाढीव खर्चास मंजुरी कारण आपला ठराव मंजुर आहे. फक्त वाढीव खर्चास मंजुरी पाहिजे. परंतु जर असा ठराव केला की, एक वर्षाची मुदत संपेपर्यंत लागणाऱ्या औषधाच्या खरेदीस मंजुरी दिली तर पुन्हा स्थायी समितीपुढे येण्याची गरज पडणार नाही. जानेवारी महिन्यापर्यंत या निविदेची मुदत आहे.

**गजानन भोईर :-**

मला याबाबत माहिती मिळेल की, जसे आता आपण याबाबत बोललात की, आपण दहा दिवसांचे औषध पाच रुपयांत देता. शाळा क्र. १५ हे प्रभाग ६ मध्ये येते, बंदरवाडी. सदरहू सदस्य नगरसेवक त्या रस्त्याने जात असतांना त्यांच्या ओळखीची एक व्यक्ती तिथल्या डॉक्टरकडून निघाली. सदरहू त्या अधिका-याने त्यांना औषधाची चिठ्ठी लिहून दिली होती की, बाहेरुन औषध घ्या. ह्याची माहिती आम्हांला मिळेल का? आणि तुम्ही ही ती माहिती घ्या की, डॉक्टरांनी अशी चिठ्ठी दिली होती का, तुम्ही बाहेरुन ती औषधे घ्या?

**डॉ. बावस्कर :-**

यामध्ये मी माहिती घेतो आणि तशी माहिती आपल्याला देतो. परंतु, असे झाले असेल की, एखादे नसेल. कारण सगळ्याच प्रकारची औषधे ठेवणे आपल्याला शक्य होत नाही. एखादे औषध जर पाहिजे असेल आणि ते आपल्याकडे नसेल तर ते बाहेरुन लिहून दिली असेल त्याची मी माहिती घेतोय.

**कैलासबेन जानी :-**

सभापती महोदय, आता आरोग्याचा विषय निघाल्यामुळे मी आपणाला विचारते की, जी टेम्बा हॉस्पीटलची जागा आहे ती आपण पुर्वीपासून आपल्या येथे घेण्याच्या मनस्थितीत आहोत. कारण किती वेळा सभाही झालेली आहे आणि ते काम अजूनपर्यंत झालेले नाही. त्याचे आपण परत फॉलो अप करणार का?

**मा. सभापती :-**

आपण त्याचे जरुर फॉलो अप करणार आणि ह्याच्यावर आपले फॉलो अप सुरु आहे. गव्हर्नमेंट फर्म झाल्यानंतर आपला पहिला प्रश्न आपली फाईल क्लिअर होईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. आपल्या सर्वांच्या वतीने आपली फाईल कंम्प्लेट लास्ट स्टेजला आहे.

**गजानन भोईर :-**

गव्हर्नमेंट फर्म झालेली आहे. आता तर शपथविधी आहे.

**रिटा शाह :-**

आरोग्य विषयासाठी जो औषधाचा ठराव आलेला आहे, जी वाढीव खर्चासाठी मंजुरी असा जो ठराव आलेला आहे त्याबद्दलचा मी ठराव मांडत आहे की, त्या वाढीव खर्चास मंजुरी देत आहे आणि ती औषधे ताबडतोब मागवून घ्यावी.

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, माझा जो प्रश्न आहे की, जी सात आठ लाख रुपये जे देणे बाकी आहे ते कशातून देणार आहात? डॉक्टर साहेबांनी सांगितले की, सात ते आठ लाख रुपये देणे बाकी आहे.

**डॉ. बावस्कर :-**

त्याची मंजुरी आपल्याकडे आहे आणि ती जी मंजुरी आहे ती मागच्या खर्चातूनच दिले जातील. या वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात तशी तरतुद आहे.

**केशव घरत :-**

मागचे पैसे जे आपण मंजुर केले होते त्याच्यातले ते पैसे शिल्लक असणार का?

**डॉ. बावस्कर :-**

होय, त्यातूनच ते जाणार.

**प्रकरण क्र. ९६ :-**

आरोग्य केंद्रासाठी आवश्यक असणा-या निविदेतील वाढीव खर्चास मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १०५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वैद्यकीय सुविधा पुरवण्यासाठी महानगरपालिकेने जानेवारी २००४ पासून आतापर्यंत ६ आरोग्य केंद्र व १ फिरता दवाखाना सुरु केलेला आहे. या आरोग्य केंद्रा मार्फत सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम राबविण्यात येतात. प्रत्येक आरोग्य केंद्र व फिरता दवाखाना मार्फत रुग्णांना सर्व प्रकारच्या आजारांवर प्राथमिक औषधोपचार करण्यात येतात. महानगरपालिकेच्या आरोग्य केद्रा मार्फत दररोज सरासरी ७०० ते ८०० रुग्णांवर औषधोपचार करण्यात येतात.

महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी आवश्यक असणा-या विविध औषधे खरेदीसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास मा. स्थायी समिती ठराव क्र. १७८ दि. ८/१/२००४ नुसार एकुण २० लाख रुपये खर्चास मंजूरी देण्यात आली होती व निविदेचा कालावधी एक वर्षासाठी ठेवण्यात आला होता.

महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रास लागलेल्या उत्तम प्रतिसादामुळे मा. स्थायी समिती ठरावातील मंजूर रक्कम पुर्णपणे खर्ची पडलेली आहे. ब-याच दवाखान्यात औषधे संपत आलेली आहेत. औषधे तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे. पुन्हा निविदा मागवून खरेदी करण्यासाठी बराच कालावधी जाण्याची शक्यता आहे. तरी मंजूर निविदेतील दराने सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शवलेली औषधे तातडीने खरेदी करणेस व त्यासाठी वाढीव खर्चास मंजूरीसाठी प्रकरण प्रशासनाकडून स्थायी समिती पाठविलेले आहे.

महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रात उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या विचारात घेता नव्याने निविदा मागवून खरेदी करण्यासाठी लागणारा कालावधी विचरात घेता रुग्णांना औषधोपचरास अडचणी निर्माण होतील. त्यामुळे तातडीने औषधे खरेदी करणे गरजेचे आहे. ही बाब विचारात घेता निविदा कालावधीत आवश्यकतेनुसार, अर्थसंकल्पीय तरतुदीच्या अधीन राहून मंजूर निविदा दराने औषधे खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या वाढीव खर्चास ही समिती मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. रिटा शाह.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९७ चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, आपल्याकडे असे कोणी सक्षम अधिकारी नाही का?

**गजानन भोईर :-**

उपविधी बनविण्यासाठी आपल्याकडे सक्षम अधिकारी आहेत का नाहीत?

**प्रभात पाटील :-**

पहिले देकार म्हणजे काय ते सांगा?

**मा. सभापती :-**

देकार म्हणजे त्याला जी एजन्सी आपण फिक्स करणार आहोत त्याला जे पैसे लागणार आहेत त्याला देकार असे म्हणता येईल व जसे सन्मा. सदस्य गजानन भोईरजी ह्यांनी जो प्रश्न विचारला की, आपल्याकडे असे सक्षम अधिकारी आहेत का? यापुर्वी आपले तत्कालीन उपायुक्त श्री. नाईक साहेब ह्यांनी आपल्याला ही तयारी दर्शविली होती. परंतु, त्यांची बदली झाली.

**गजानन भोईर :-**

त्यांनी ०५/०१/२००४ च्या पत्राने तुम्हांला कळविले आहे की, कामाच्या व्यापामुळे सदरच्या कामात असमर्थता दर्शविली होती. तर त्या पाच तारखेचे पत्र आपल्याकडे आहे का?

**मा. सभापती :-**

ते पत्र दाखवावे.

**गजानन भोईर :-**

तसेच आपल्याकडे कायदे सल्लागार आहेत, विधी सल्लागार आहेत. मग ते काय नक्की कामे करणार? त्यांची पात्रता आहे ना ही कामे करण्याकरिता?

**मा. सभापती :-**

आपल्या ज्या उपविधी असतात हा विषय कम्प्लिट वेगळा आहे आणि जे कायदेशीर सल्लागार आपल्याकडे आहेत, विधी सल्लागार हे कम्प्लीट वेगळे आहे. आपल्याला मिरा भाईंदर महानगरपालिकेचे व नगरपालिकेची जी उपविधी आहे हा वेगळा भाग आहे आणि आपण जे विधी सल्लागार नेमले आहेत ते कोर्टाचे किंवा अन्य काही बाबींच्या सल्ल्याची आपल्याला आवश्यकता असेल त्याची माहिती ते देतील.

**गजानन भोईर :-**

आपल्याकडे कायदे सल्लागार काय करतात? त्याची माहिती आपण आम्हांला द्या की, त्यांचे मिरा भाईंदर महानगरपालिकेत त्यांचे नक्की काम काय आहे?

**मा. सभापती :-**

सध्या सभागृहात कायदे सल्लागार अनुपस्थित आहेत.

**रिटा शाह :-**

साहेब, ते सभागृहात नाही आहेत ते आम्हांला मान्य आहे.

**गजानन भोईर :-**

ते सध्या काम काय करतात आणि त्यांनी आजपर्यंत किती कामे केलेली आहेत आणि किती कोर्टाचे निर्णय आपल्या बाजूने लागले आणि किती लाख रुपयांचा त्यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेला फायदा करुन दिलेला आहे?

**मा. सभापती :-**

विधी सल्लागार अनुपस्थित आहेत. त्यांना आपण पुढच्या सभेला माहिती विचारुन घ्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्यांचा विषय आहे आणि ते अनुपस्थित आहेत.

**मा. सभापती :-**

हा विषय वेगळा आहे.

**अशोक पाटील :-**

हा विषय आपल्याला उपविधी आवश्यक आहे. आपली महानगरपालिका बनून आज जवळ जवळ दोन वर्ष होऊन गेली व त्यामुळे उपविधी होणे गरजेचे आहे. ही उपविधी नसल्यामुळे ब-याचशा कामात अडचणीही निर्माण होत आहेत. त्यामुळे आपण हे काम करण्याकरिता एजन्सी नेमण्याचा विषय आणलेला आहे. त्याला आपण ही सभा मंजुरी देत आहे. मी ठराव मांडत आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

हे काम जर शिवमुर्ती नाईक साहेब करु शकतात तर शेख साहेब, पानपट्टे साहेब हे काम करु शकत नाही का? हे सक्षम नाहीत का? आपण ह्याच्यावर बाहेरुनच एजन्सी का नेमणार? आमचा ह्याला विरोध आहे.

**गजानन भोईर :-**

आमचा ह्या ठरावाला स्पष्ट विरोध आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

येथे सक्षम अधिकारी आहेत ना?

**अशोक पाटील :-**

त्या अधिका-यांनी तशी समर्थने दाखवावीत की, आम्ही ही कामे करु शकतो.

**प्रभात पाटील :-**

प्रत्येकासाठी ठेका पद्धत आपण येथे काय करणार आहोत. पालिका येथे फक्त माणसांनी भरलेली आहे.

**गजानन भोईर :-**

आपण नगरसेवक देखील ठेका पद्धतीने मागवा.

**प्रभात पाटील :-**

आपण मागवा, ते ही ते देतील.

**गजानन भोईर :-**

नगरसेवक ठेका पद्धतीने पाहिजे, अशी निविदा द्या आपण पेपरला. आपल्याला असे भरपूर नगरसेवक मिळतील.

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या मान्यतेने बोलतो. उपविधी, नियम आणि विनियम बनवायला एक स्वतंत्र आणि अनुभवी व्यक्ती लागते की, त्यांनी प्रशासनाचे नियम, उपविधी, विनियम बनविलेले आहेत, फक्त अशाच लोकांना ते बनविता येतात. उपायुक्त किंवा आपल्याकडील जे कोणी अधिकारी आहेत, एक तर ते त्यांच्या कार्यात व्यस्त असतात. अशा कामासाठी एक तर पुर्ण वेळ अधिकारी किंवा ज्याला अनुभव आहे अशी व्यक्ती उपलब्ध असणे आवश्यक आहे. आपल्या कुठल्याही अधिका-याकडे एवढा वेळ नाही.

**प्रभात पाटील :-**

नाईक साहेबांकडे एवढा वेळ होता.

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सो.) :-**

नाईक साहेबांनी नाही म्हणून सांगितले आहे. त्यांचे पत्र माझ्याकडे आहे.

**प्रभात पाटील :-**

बघा, त्यांनी नाकारले हा नंतरचा भाग आहे. अगोदर तुम्ही त्यांच्यावर जबाबदारी टाकलेली आहे. त्यांनी ते स्वतःहून नाकारले आहे. आता तुम्ही अधिका-यांवर जबाबदारी टाका ना.

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सो.):-**

त्यांच्यावर स्थायी समितीने जबाबदारी टाकलेली होती. पण त्यांना वेळ नसल्यामुळे त्यांनी ते नाकारलेले आहे. मी तेच सांगतो. आपल्या कुठल्याही अधिका-याकडे एवढा वेळ नाही. आपण विधी सल्लागाराकडे पण विचारणा केली होती. विधी सल्लागारांकडे भरपूर काम असल्यामुळे ते शक्य नाही. विधी बनवायला साधारणतः पाच ते सहा महिन्याचा कालावधी लागणार आहे. उपविधी एक महिना किंवा पंधरा दिवसामध्ये होणे शक्य नाही. आमची चर्चादेखील झालेली आहे. तर या सर्व प्रोसीजरसाठी खूप वेळ लागणार आहे. आपल्या कुठल्याही अधिका-याकडे एवढा वेळ नाही की, हा सर्व अभ्यास करुन स्वतंत्रपणे विभाग तयार करावेत. यासाठी एक अनुभवी म्हणजे ज्याने असे उपविधी बनविलेले आहेत अशा तज्ञ व्यक्ती मागवून उपविधी करा.

**कैलासबेन जानी :-**

ते अनुभवी नाही आहेत का?

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सो.):-**

आपले उपायुक्त अनुभवी आहेत. तथापि, असे विधी, उपविधी, विनियम कोणीही बनविलेले नाही. हे काम स्वतंत्र आहे. त्यासाठी कायदातज्ञ असणे आवश्यक आहे.

**गजानन भोईर :-**

झाडांची जात ओळखण्यासाठी आपल्याकडे इतकी सक्षम माणसे नाही आहेत. उपविधी बनविण्यासाठी आपल्याकडे इतकी सक्षम माणसे नाही आहेत. मग आपल्या महानगरपालिकेकडे कुठले सक्षम अधिकारी आहेत?

**कैलासबेन जानी :-**

आपल्या महानगरपालिकेकडे उपविधी बनविण्यासाठी एकही तज्ञ नाही.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, आपल्याकडे तीन उपायुक्त आहेत. तीन उपायुक्तांनी महापालिकेमार्फत कुठली कामगिरी पार पाडली जाते. तीन उपायुक्तांना महापालिकेने कुठली कामगिरी सोपविली आहे. त्याचा जरा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :-**

विषय असा आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेमधील असलेले उपायुक्त यांचा मघाशी या ठिकाणी उद्घोष झाला की, त्यांनी उपविधी निर्माण केल्या पाहिजेत. आपल्याला माहिती आहे की, उपविधीमध्ये आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचा कायदा, तर मिरा भाईंदर महानगरपालिकेचा कायदा बनविण्यासाठी त्या ठिकाणी तो तज्ञ असणे जरुरी आहे. म्हणजे त्याला त्याची संपूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. सर्वच उपायुक्तांना किंवा सर्वच अधिका-यांना जो आपला उपविधी किंवा कायदा बनवायचा असेल त्याची माहिती असणे हा विषय नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण महापालिकेतर्फे वकिल ठेवले त्यांना माहिती असेल ना?

**मा. सभापती :-**

नाही. तो सल्ला कायदेशीर झाला. जे सिव्हील मॅटर किंवा कोर्टासंदर्भात मॅटर येतात. ते कायदेशीर सल्लागार झाले आणि आपले जे उपविधी असतात की, मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये कोणत्या कायद्याने आपण काम केले पाहिजे. आपला स्वतःचा कायदा असला पाहिजे. त्याकरिता आपल्याला ही उपविधी बनवायची असते आणि त्याकरिता सक्षम अधिकारी पाहिजे. माझ्या माहितीप्रमाणे सर्वांना अनुभव आहे की, आपण त्यांना काम दिले होते. उपायुक्त नाईक साहेबांनी काम घेतलं नव्हतं. आमची अशी धारणा निर्माण झाली होती की, उपायुक्त नाईक साहेब हे काम करु शकतात. जेव्हा तुम्ही एका अधिका-यांच्या टेबलवर बसल्यानंतर किंवा समोर बसल्यानंतर ते अधिकारी आपल्याशी कोणत्या पद्धतीने सुसंवाद साधतात आणि कोणत्या पद्धतीने आपल्याला सल्ला देतात. त्यावरुन आपण कल्पना करु शकतो की, हे अधिकारी आपल्याला सक्षम असे काम करुन देऊ शकतात किंवा त्यांना या विषयाची माहिती आहे हे आपल्याला ज्ञात होते आणि त्याप्रमाणे आपण त्यांना सांगितले होते की, तुम्ही हे उपविधी बनवा. तुम्ही उपविधी बनवू शकता असे आम्ही त्यांना सांगितले व त्यांनी ते काम घेतले देखील. पण वेळेच्या अभावामुळे त्यांनी ते काम नाकारले. त्यांनी आपल्याला लेखी दिलेले

आहे. आपण या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये काम करतो. तेव्हा आपल्यालादेखील कल्पना असेल की, एखादा कोणता अधिकारी काम करु शकतो म्हणजे मुख्याधिकारी असतांना आपल्याकडे नाईक साहेब होते, आयुक्त म्हणूनही त्यांनी काही काळ आपल्याकडे कामकाज पाहिले. नंतर उपायुक्त ते आपल्याकडे होते. नाईक साहेब आपल्याला ज्या पद्धतीने एखाद्या कामाबद्दल सल्ले द्यायचे. त्यावेळेला आपल्याला माहिती होते की, आपले हे काम नाईक साहेब करु शकतात आणि आपली ही धारणा निर्माण झाली होती आणि त्यावेळी नसतांना देखील आपण त्यांना सांगितले की, आपण उपविधी बनवा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

तुमचे असे म्हणणे आहे का की, शेख साहेब आणि पानपट्टे साहेब सक्षम नाहीत?

**सुर्यकांत भोईर :-**

पानपट्टे आणि शेख साहेब बसलेले असतात. त्यांच्याकडे कुठे कामे असतात.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीस, आपली धारणा काय आहे?

**जोजफ घोन्सालवीस :-**

माझी अशी धारणा आहे की, शिवमुर्ती साहेब जर उपायुक्त असतांना उपविधी करु शकतात. तर हे का करु शकत नाहीत?

**मा. सभापती :-**

ते बरोबर आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ते करु शकतात. ते सक्षम आहेत. त्यांच्यावरच काम सोपवा.

**मा. सभापती :-**

तुम्ही त्यांच्याशी सुसंवाद साधले. त्यावेळी तुम्हांला अशी माहिती झाली का? त्यांनी आपल्याला जे कायदेशीर सल्ले दिले त्यामधून आपल्याला अनुभव आला का की, हे सो ॲण्ड सो जे साहेब आहेत ते आपल्याला खरोखर चांगला कायदेशीर सल्ला देतात आणि आपल्या १९४९ च्या कायद्याप्रमाणे तंतोतंत माहिती देतात.

**जोजफ घोन्सालवीस :-**

या पदावर कोणी आलतू-फालतू माणूस ठेवला तर चालेल का?

**मा. सभापती :-**

आपण जेव्हा एखादी एजन्सी नेमू तेव्हा आपण त्याचा विचार करु. ती एजन्सी आपल्याला काम देऊ शकते की नाही? हा विचार आपण करणार ना आणि अशा एजन्सीने महानगरपालिकेचे काम केले असेल तेव्हाच आपण त्यांना ते काम देणार.

**सुर्यकांत भोईर :-**

प्रत्येक वेळी अधिकारी येऊन बसतात. ते काही काम करीत नाहीत. तुम्ही फक्त नवीन अधिकारी मागवत बसतात. त्यांच्याकडून काय कामे करुन घेता? ते तुम्ही आम्हांला सांगा. अधिका-यांना तुम्ही बोलावता, बसवता, त्यांना कॅबिन बनवून देता, मग ते आरामात बसतात, नाहीतर आतमध्ये झोपा काढतात. कुठला अधिकारी काम करतो? ते तुम्ही सांगा. ते तुम्ही समोर आणा.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, माझा हाच प्रश्न होता की, रणखांब साहेब मुख्यालय सांभाळतात तसेच इतर जे तीन उपायुक्त साहेब आहेत त्यांचे काम काय आहे? ते सांगा. म्हणजे आम्हांला त्यांच्या त्या दृष्टीकोनातून संपर्कात येता येईल.

**मा. सभापती :-**

उपायुक्त (मुख्यालय) आपल्याकडे जे उपायुक्त आहेत त्यांना आपण काय-काय जबाबदारी दिली याची आपण जरा माहिती द्यावी आणि सोबत विषयाची माहिती द्यावी.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

या ठिकाणी उपविधी मांडण्याबाबतच्या विषयावर जी चर्चा झाली त्याचा मी या ठिकाणी सविस्तर खुलासा करतो. आपल्याला जे उपविधी बनवायचे आहेत ते चोवीस उपविधी बनवायचे आहेत. चोवीस उपविधी बनविण्यासाठी सन्मा. सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत की, महानगरपालिकेकडे उपस्थित असलेले उपायुक्त श्री. शेख आणि श्री. पानपट्टे साहेब यांनी हे करावेत. मुलतः हे जे उपविधी बनवायचे आहेत त्याची यादी मी सर्वसाधारणपणे आपल्यासमोर देतो. याच्यामध्ये आस्थापना विषयक उपविधी आहेत. नगरपालिकेच्या विविध कामकाजा संदर्भातील उपविधी आहेत.

महानगरपालिकेच्या आरोग्य विषयावर उपविधी आहेत आणि जे जे दैनंदिन कामकाज म्हणजे स्थायी समिती, कॉर्पोरेशन एम्प्लॉईज वगैरे संदर्भात उपविधी आहेत. या दोन्ही उपायुक्तांकडे इतर कामे आहेतच. तथापि, हे उपविधी तयार करतांना याचा अर्थ त्यांना अनुभव नाही असे नाही. परंतु, जे महानगरपालिकेचे कामकाज आहे ते यापुर्वी त्यांनी पाहिलेले नाही आणि जे कामकाज त्यांच्याकडे आहे ते कामकाज या सगळ्या बायलॉजमध्ये इन्कॉर्पोरेट होईल असेही नाही. त्यामुळे हे बायलॉज तयार करतांना अत्यंत अनुभवी अधिकारी असण्याची आवश्यकता आहे की, ज्याने महानगरपालिकेत किंवा राज्य शासनाच्या किंवा इतर खात्याच्या ॲथिक्स ऑथोरिटीमध्ये काम केलेले आहे की, जे हे उपविधी बनवू शकतात. याचा अर्थ असा नाही की, ते सक्षम नाहीत. परंतु, एखादा उपविधी तयार करणे याचा अर्थ असा की, महानगरपालिकेचा जो कायदा आहे त्या कायद्याचा जो भाग आहे त्या भागाच्या व्यतिरिक्त आपल्या महानगरपालिकेला त्या कायद्याची कशा पद्धतीने अंमलबजावणी करता येईल याचा बायलॉज किंवा ज्याला आपण उपविधी बोलतो तर ता बायलॉज प्रत्येक महानगरपालिका वेगवेगळे बनविते. म्हणजे आपले जे मिरा भाईंदरचे बायलॉज असतील ते वेगळे असतील. ठाण्याचे वेगळे असतील, नाशिकचे वेगळे असतील, औरंगाबादचे वेगळे असतील. त्यामुळे त्या त्या भागाची माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे. शेख साहेब आणि पाणपट्टे साहेब ज्या भागात काम करतात. कारण शेख साहेब पुर्वी नगरपालिकेमध्ये काम करायचे. त्यामुळे महानरपालिकेमध्ये काम करणे आणि महानगरपालिकेचा काम करण्याचा जो प्लॅटफॉर्म आहे तो शिवमुर्ती नाईक साहेबांना होता. म्हणून स्थायी समितीने अधिकारीपणाने वागण्याची जबाबदारी दिली होती. मा. सभापती साहेब, त्यांच्याकडे जबाबदारी देऊ इच्छित नाही. ह्या बायलॉजमध्ये जर चुक झाली तर महानगरपालिकेचे काम करतांना अडचणी निर्माण होतील. त्या अडचणी भविष्यकाळात निर्माण होऊ नयेत म्हणून बायलॉज तयार करतांना ज्याला खरोखर माहिती आहे अशा अधिकाऱ्याची नियुक्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण हे बायलॉज तयार केल्यानंतर या बायलॉजच्या आधारे महानगरपालिकेचे कार्यक्रमण किंवा कार्यकाल किंवा पुढचे प्रत्येक कामकाज होणार आहे. त्यामुळे याची गांभीर्यता लक्षात घ्या आणि या दृष्टीकोनातून याच्यामध्ये आपला कुठलाही अधिकारी नेमायचा नाही. आपण हे काम कंत्राटी पद्धतीने देणार आहोत. त्यामुळे कुठल्याही प्रकारच्या अधिकाऱ्याची या ठिकाणी नियुक्ती केली जाणार नाही. प्रशासनामधील जे माहितगार अधिकारी आहेत, सेवानिवृत्त असतील किंवा आणखी कुठले असतील त्यांच्याकडे हे काम द्यायचे आहे अशी या विषयाची पार्श्वभूमी आहे. हे जे बायलॉज आहेत त्या बायलॉज संदर्भात मी तुम्हांला सविस्तर सांगतो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५(५३) नेमणुकीचे अधिकार, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे जकात नियम २००४ याच्यानंतर मिरा भाईंदर महानगरपालिकेचा परवाना अभियंता, संरक्षण अभियंता, नळ कारागीर, शैक्षणिक अर्हता, अनुभव उपविधी २००४. महानगरपालिकेच्या मधील निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी जागा वापरणे उपविधी, महानगरपालिकेचे नवीन उद्योगधंदे, कारखाने उभारणी याच्यासाठी उपविधी. मिरा भाईंदर म्युनिसिपल कॉर्पोरेशन रेग्यूलेशन ऑफ दी म्युनिसिपल वॉटर सप्लाय यांच्यासाठी उपविधी. महानरपालिकेच्या इमारतीची नियतकालिक तपासणी करणे त्याचे उपविधी. महानगरपालिकेच्या अभिलेखाची पाहणी करणे, अभिलेखाच्या प्रतिंप्रमाणेच करणे याच उपविधी. महानगपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन, सफाईचे नियोजन करणे याचे उपविधी. महानगरपालिकेच्या संसर्ग साथीच्या रोगांच्या बद्दलचे उपविधी. महानगरपालिकेचे बाजार, खाजगी बाजार, कत्तलखान्यांचे नियम यांचे उपविधी. महानगरपालिकेच्या हद्दीमधील खाणावळी, उपहारगृहे लॉजींग यांचे उपविधी. महानगरपालिकेचे बांधकाम विषयक उपविधी. महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचारी यांचे अतिकालीन भत्ते व पुरक याचे नियम. महानगरपालिका पालिका सदस्यांचे प्रवास व पुरक भत्ते नियम. महानगरपालिकेचे सभागृह नेता, सन्मा. विरोधी पक्ष नेता मानधन, भत्ते व इतर सुविधा देणे याचे नियमन. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या जागेतून लेखा परिक्षकाची कार्यपद्धती याचे अधिनियम. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर्मचारी अंतर्गत विभागीय परिक्षा याचे उपनियम. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांचे शैक्षणिक साहित्य, गणवेश, सकस आहार पुरविणे याचे नियम. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचे नियम. स्टँडींग कमिटी फॉर द कॉर्पोरेशन एम्प्लॉईज ॲण्ड इंडस्ट्रीअल एम्प्लॉयमेंन्ट स्टँडींग ऑर्डर्स यांचे उपविधी. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्तेची विक्री स्थायी आदेश यांचे उपविधी. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे कलम ४६६(१)(क) च्या खाली उपविधी. अशा प्रकारचे हे वेगवेगळे उपविधी तयार करायचे आहेत. याला अत्यंत सक्षम आणि माहितगार अधिकाऱ्याची गरज आहे. आपल्याकडे उपलब्ध असलेले सध्याचे उपायुक्त याच्यामध्ये इतके नॉलेज कॉन्ट्रीब्युट करु शकणार नाहीत. त्यामुळे मा. सभापतींनी जो विषय

या ठिकाणी सभेपुढे ठेवलेला आहे की, आपण कंत्राटी पद्धतीने आपले बायलॉज तयार करायचे. या संदर्भात मी माहिती दिली. आणखी कुणाला माहिती पाहिजे असेल तर खुलासा करेन.

**रिटा शाह :-**

याच्यामध्ये एक माहिती पाहिजे. माझे दोन-तीन प्रश्न आहेत. एक तर आपण हे उपविधी करण्यासाठी कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर कुठल्या चांगल्या व्यक्तीला तुम्ही नियुक्त करतात. त्याची मंजुरीची दुमत नाही. कुठलीही महानगरपालिका चालवायला त्याला अधिनियम आणि नियम पाहिजेच. ते नियम बनवितांना ते कॉन्ट्रॅक्ट पद्धतीवर आलेले ऑफीसर त्यांची टाईम लिमिटेशन किती? तुम्ही त्यांना पगार किंवा जे काही मानधन देणार आहात ते किती देणार आहात? तिसरे म्हणजे जे उपविधी बनविणार आहेत ते स्थायी समिती आणि नगरसेवकांना विश्वासात घेऊन बनविणार आहेत की, ते उपविधी डायरेक्ट डिक्लेअर होणार आहेत? हे माझे तीन महत्वाचे प्रश्न आहेत.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

हे जे उपविधी तयार केले जाणार आहेत. ते उपविधी तयार करण्यासाठी कुठल्याही अधिका-याची नेमणुक केली जाणार नाही याचा मी तुम्हांला पहिल्यांदाच खुलासा केला. याच्यासाठी ज्याच्याकडे स्थायी समितीच्या मंजुरीने काम दिले जाईल. त्यांनी हे काम स्थायी समितीच्या निदर्शनानुसार करायचे आहे. त्यामुळे आपण स्थायी समितीचे सन्मा. सदस्य आहात. मला वाटते, त्यामुळे याच्यामध्ये काही अडचण येणार नाही.

**मा. सभापती :-**

ते पुढे महासभेला जाणार आहे.

**रिटा शाह :-**

माझे कन्फ्युजन तेच आहे की, त्यांनी समजा आस्थापना डिपार्टमेंन्टसाठी कायदे किंवा उपविधी बनविले. ते सर्व उपविधी बनवून स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी येणार ना? आणि त्याला लिमिटेशन किती?

**अशोक पाटील :-**

त्याचा कच्चा आराखडा त्या लोकांनी आपल्याला सादर केल्यानंतर आपण त्याच्यावर काहीतरी फेरबदल करायचे असतील किंवा सुचना करायच्या असतील.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

महासभेला जाण्याच्या पुर्वी मा. सभापतींनी निर्देश दिल्याप्रमाणे स्थायी समितीच्या निर्देशानुसार त्या कच्च्या मसुद्याला मान्यता दिली जाईल. त्यानंतरच महासभेपुढे विषय येईल.

**रिटा शाह :-**

त्याच्यानंतर याचे टाईम लिमिट किती?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

या ज्या टर्मस् आहेत. हा प्राथमिक मान्यतेचा विषय आहे. याच्यामध्ये आपण त्याचे टर्मस् कंडिशन्स ठरविणार आहोत. तर त्याचीसुद्धा आता चर्चा केली तर?

**रिटा शाह :-**

म्हणजे मानधन आणि हे सर्व विषय परत येणार?

**अशोक पाटील :-**

ठेका आहे. एजन्सी नेमणार आहोत.

**रिटा शाह :-**

मा. सभापती साहेब, सध्या आपल्याकडे जो उपविधीसाठी सल्लागार नेमण्यासाठी ठराव आलेला आहे. कंत्राट पद्धतीने देण्याबाबत जो ठराव आलेला आहे त्याबद्दलचा मी ठराव मांडत आहे.

**प्रभात पाटील :-**

ठराव मांडला त्याच्या अगोदर मी बोलते की, रणखांब साहेबांनी जेवढे उपविधीचे विषय दिले. मला एकच म्हणायचे आहे की, गोषवारा देतांना तुम्ही आता वाचून दाखविले ते किती विषय होते. गोषवा-यामध्ये काहीच विषय नाही. जे उपविधी तुम्ही बनविणार आहात त्याच्या कितीतरी चांगल्या पद्धतीने तुम्ही वाचून दाखविले. सभापती महोदय, या ठिकाणी फक्त चर्चा होते. विरोध कोणाचाच नसतो. फक्त तुमचा गोषवारा येतो तो त्या अनुषंगाने आलेला नसतो.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मा. सभापतींच्या वतीने मी खुलासा करतो. सकाळीच सगळ्या अधिका-यांचा त्यांनी आढावा घेतला की, त्यांचा स्वतःचा याच्यावर आक्षेप आहे की, त्यांनी सांगितले की, माझ्या सर्व सन्मा.

सदस्यांना अशा प्रकारचा सविस्तर गोषवारा किंवा सविस्तर माहिती दिली गेली पाहिजे. ही त्यांची सुचना आहे. पुढच्या वेळेला आम्ही त्याची दखल घेऊ.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही जी खाती वाचून दाखविली ती सगळी उपायुक्तांच्या अंडर चालतात ना?

**मा. सभापती :-**

जी खाती उपायुक्तांच्या अंडर चालतात त्याचे खातेतज्ञ जे तुम्ही बोललात की, ज्या खात्यात नगरपालिकेत ज्यांनी काम केलेले आहे आणि महानगरपालिकेत ज्यांनी काम केलेले आहे त्याची संपूर्ण माहिती दिली ना.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपल्याला ही सवय लागलेली आहे. प्रत्येक वेळेला ठेकेदारामार्फत काम करायचे. आता या ठिकाणी दोन लघुलेखक आढळले. याला कशाला ठेकेदार पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये तुम्ही जे अधिकारी निवडता ते सक्षम आहेत की, नाही ते बघायला पाहिजे. आता दोन उपायुक्त आहेत ते ऑफीसमध्ये बसलेले असतात. ते या ठिकाणी काय कामे करतात.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ठराव मांडू नका.

**सुर्यकांत भोईर :-**

प्रत्येक अधिका-याला तुम्ही केबीन बनविता. तो केबीनमध्ये आरामशीर बसतो.

**मा. सभापती :-**

हा तुमचा नंतरचा विषय आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

महापालिकेमध्ये असे अधिकारी आहेत की, ज्यांना काहीही माहिती नसते. फक्त अधिकारी आहेत.

**मा. सभापती :-**

उपविधी म्हणून तुम्हांला एवढे सांगितल्यानंतर आपण आपला कायदा बनवतो. जेव्हा तो मिरा भाईंदर महानगरपालिकेचा कायदा बनेल त्या कायद्यावर आपले कामकाज चालणार आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, त्या त्या डिपार्टमेन्टमधील जे अधिकारी असतील त्यांना घेऊन आपल्या महापालिकेचे वकिल आहेत. त्यांना एकत्र घेऊन बसून तुम्ही बनवू शकता.

**मा. सभापती :-**

वकिलांचा प्रश्नच नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही अधिकारी आणाल, त्याला बसवाल, त्याला सहा महिन्याची मुदतवाढ देणार. परत त्याला सहा महिन्याची मुदतवाढ देणार. म्हणजे तो वर्षभर महापालिकेत तिथे बसून राहिल, तो पक्का झाला, त्याला एक कॅबिन दिली, खुर्ची दिली की, तो ऑफीसमध्ये आरामात बसला, हेच होत आहे. गेल्या तीन वर्षापासून मी हेच बघतो. फक्त अधिका-याला आणायचे, ठेवायचे, त्याला सहा महिन्याची मुदत द्यायची, परत सहा महिन्याची मुदत द्यायची की, जायचे. तो अधिकारी सक्षम आहे का बघा?

**अशोक पाटील :-**

ठरावामध्ये शेवटी सगळे नमूद केलेले आहे. ठराव पूर्ण वाचून झाल्यानंतर चर्चा करा.

**मा. सभापती :-**

ठराव पहिले वाचून घ्या.

**सुर्यकांत भोईर :-**

माझा याला काही विरोध नाही. पण हा अधिकारी आहे त्याला तुम्ही मुदत देऊ नका.

**अशोक पाटील :-**

महानगरपालिकेच्या एक प्रकारच्या घटनेनुसार महानगरपालिकेचा कार्यभार चालणार आहे आणि ही आवश्यक बाब आहे. तेव्हा ठराव वाचून झाल्यानंतर तुम्ही चर्चा करा.

**प्रभात पाटील :-**

याच्यामध्ये नगरसेवकाला त्याचे नियम कळणार आहे. त्यांचे भत्ते कळणार आहेत. स्थायी समितीचे सर्व कळणार आहे. अधिका-यालासुद्धा त्याचे फायदे मिळणार आहेत. ते सर्व आम्हांला नको अशातला भाग नाही. परंतु, पालिकेमध्ये कायम भरतीच चालू आहे. काम कुठे आहे?

**अशोक पाटील :-**

तोच मुद्दा त्या ठरावामध्ये दिलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

याच्यात तुमचेही भले, माझेही भले आणि या अधिका-यांचेही भले आहे. आपल्याला मान्य आहे आणि अधिका-यांचे सगळ्यात जास्त भले आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांनी या ठिकाणी त्या भुमिका मांडलेल्या आहेत. त्या भुमिकेशी मी पूर्णपणे सहमत आहे. आपण ही एजन्सी नेमल्यानंतर त्याला कोणत्याही पद्धतीने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यालयात अशी कोणतीही जागा देण्यांत येणार नाही. त्यांनी बाहेरुन काम करुन त्यांनी आपल्याशी संपर्क साधून काम करायचे आहे. त्याचा वेळच्या वेळी रिपोर्ट देईल. तो रिपोर्ट आपल्या स्थायी समितीपुढे येईल.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, मी एक प्रश्न विचारला होता. जसे रणखांब साहेब कार्यालय सांभाळतात, इतर जे तीन उपायुक्त आहेत त्यांच्यावर महापालिकेची जबाबदारी काय? याची जरा माहिती मिळू द्या. आम्ही काम असल्यावर कोणाकडे जाणार?

**मा. सभापती :-**

तुम्हांला याची माहिती पुढच्या सभेमध्ये देतो.

**केशव घरत :-**

साहेब, आता बांधकाम खातं कोणाकडे आहे किंवा पाणी खातं कोणाकडे आहे ते कळले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

उपायुक्त बसलेले आहेत. त्यांना माहिती नाही का की, आपल्याकडे कुठले खाते आहे? मग ते कशाला बसले आहेत? तुम्ही असे कसे म्हणता?

**केशव घरत :-**

फक्त त्यांना खुर्चीवरच बसण्याचे काम आहे का? त्यांच्यावर काहीच जबाबदारी नाही आहे का?

**सुर्यकांत भोईर :-**

त्यांना वाटत नाही का की, आमच्याकडे काहीच काम नाही.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

मी उपायुक्त शेख. माझ्याकडे जाहिरात विभाग दिलेला आहे. पे ॲण्ड पार्किंग विभाग दिलेला आहे. लायब्ररी आणि जन्म-मृत्युचा विभाग दिलेला आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मी उपायुक्त एस्. एस्. पानपट्टे. माझ्याकडे अग्निशमन, पशुसंवर्धन आणि सुवर्ण जयंती स्वयंरोजगार योजना हा विभाग दिलेला आहे.

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सो.) :-**

मी रमेश मनाळे. माझ्याकडे सहाय्यक आयुक्त, सामान्य प्रशासन आणि अतिक्रमण विभाग सोपविलेला आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, हे नगरसेवकांचे महत्वाचे डिस्कशन कशाला चालू आहे? कारण जेव्हा नगरपालिका होती तेव्हापासून आपण लोक आहेत. नगरपालिका होती तेव्हा फक्त एक इंजिनिअर म्हणून बारकुंड साहेब आणि आता इंजिनिअर म्हणून आपल्याकडे भरपूर माणसे आली. आता मी फक्त माझ्या वॉर्डाचा प्रश्न तुम्हांला सांगते. मी ज्या गल्लीत राहते तो माझा वॉर्ड नाही. पण मी ज्या बिल्डींगमध्ये राहते तिकडची अशी परिस्थिती निर्माण झाली होती. तिथे गटारावर स्लॅब टाकायचे आहेत. त्या स्लॅब टाकण्याची उंची किती? वाढीव किती? त्याला किती माप द्यायचे? त्याच्यामध्ये काय मटेरिअल वापरले आहे? ते सर्व बघण्याचे काम इंजिनिअरचे आहे. पण एकही इंजिनिअर तिकडे येत नाही. तुम्ही आता तिकडे प्रत्यक्ष येऊन बघा की, तो स्लॅब टाकला आहे त्याची उंची केवढी घेतली आहे? बिल्डींगवाल्याला यायचे आणि जायचे. त्याबद्दल मी तक्रार केली तेव्हा फक्त बारकुंड साहेब तिकडे

येऊन गेले. सिटी इंजिनिअर यांना मी फोन केला. तेव्हा ते रजेवर होते आणि मला माहिती नाही की, ते रजेवर होते की, कुणाच्या फॅमिलीच्या घरी बसले आहेत. त्यानंतर देखील तिथे कोणी काही दखल घेतली नाही. ते जसे बनविले आहे तसेच बनविले आहे. म्हणजे नगरसेवकांच्या तक्रारींचे त्याच्यामध्ये काहीही होत नाही, म्हणून ते नगरसेवक असे करतात. मग ऑफीसर कशाला आणायला पाहिजे.

(सन्मा. सदस्या श्रीम. रिटा शाह यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**रिटा शाह :-**

हा जो तज्ञ आपण ठेवणार आहे त्याची टाईम लिमिट निश्चित करा की, दोन महिन्यात बनवून देणार, चार महिन्यात बनवून देणार की, सहा महिन्यात बनवून देणार हे टाईम लिमिटेशन टाकून मी हा ठराव मांडत आहे.

**अशोक पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सचिव साहेब, आम्हांला जरा माहिती द्या. असा काही जी.आर. आहे का की, मानधनावर कुठलाही अधिकारी आपल्याला नेमता येणार नाही किंवा प्रतिनियुक्तीवरही नाही? असा काही जी.आर. आहे का?

**मा. सभापती :-**

जी.आर. नाही आहे. आपण मागे जी इंजिनिअरची भरती केली त्या संदर्भामध्ये किंवा जी मंजुरी दिली त्या मंजुरीच्या बरोबर आपल्याला काही माहिती आलेली आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, मी ठराव मांडलेला आहे. याच्यामध्ये मनपा अधिकारी जे आता काम करतात. सेवा नियम येईपर्यंत ते जसे काम करतात तसेच ते राहणार की, तुम्ही त्याच्यावर प्रतिनियुक्ती म्हणून दुसरे कोण आणणार?

**जोजफ घोन्सालवीस :-**

म्हणून विचारतो की, काय आणायचे?

**मा. सभापती :-**

जोपर्यंत हे उपविधी मंजुर होत नाही. तोपर्यंत प्रतिनियुक्तीवर आपण कोणाला आणणार नाही.

**अशोक पाटील :-**

आपण त्याला मान्यता देणार नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह यांनी जो ठराव मांडला तो मी तुम्हांला वाचून दाखवतो.

(मा. सभापती सो. ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, आपल्याकडे काय माहिती आली?

**गजानन भोईर :-**

साहेब, जी.आर.ची थोडी माहिती द्या.

**मा. सभापती :-**

मी आपणांस ही माहिती नंतर देतो. पुढचा विषय घेण्यांत यावा.

**गजानन भोईर :-**

साहेब, सगळीच माहिती आपण पुढे द्यायला लागलात तर कसे होईल? जी.आर.ची माहिती आम्हांला द्या.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, जकात विभाग कोणाकडे आहे? कोण बघते?

**गजानन भोईर :-**

मिटींग संपल्यानंतर. अगोदर माहिती का देत नाही?

**मा. सभापती :-**

तुम्हांला माहिती मिटींग संपण्यापुर्वी देतो.

**गजानन भोईर :-**

सदर विषयाबाबत माहिती आम्हांला मिळू दे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

उगाच आम्हांला त्याच्यात कशाला अडकवता?

**मा. सभापती :-**

आपल्याला त्याच्यामध्ये कुठे अडकवले आहे? तुम्हांला अडकवत नाही.

**गजानन भोईर :-**

जी.आर.ची सदस्यांना माहिती द्यायला काय हरकत आहे?

**रिटा शाह :-**

म्हणजे यांचा विचारायचा असा अर्थ आहे की, प्रतिनियुक्तीवर बंधन आलेले आहे. म्हणून ते इनडायरेक्टली ठराव पास करुन घ्यायचा असे काहीतरी आहे.

**मा. सभापती :-**

तुमचा प्रश्न व्यवस्थित सांगा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

असा एखादा जी.आर. आला का की, मानधनावर आपल्याला अधिकारी नियुक्त करता येणार नाही? पण प्रतिनियुक्तीवर सुद्धा आपल्याला नेमता येणार नाही? असा जी.आर. आहे का?

**मा. सभापती :-**

जी.आर. म्हणजे जो शासनाने राजपत्रात एखादा कायदा बनवून दिलेला असतो त्याला जी.आर. बोलतात. मी आस्थापनाला विचारतो की, असा शासनाचा कायद्याचा जी.आर. आपल्याकडे आलेला आहे का?

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सोा.) :-**

प्रतिनियुक्तीवरील अधिकारी नेमता येणार नाही अशा प्रकारचा कुठलाही शासनाचा जी.आर. आलेला नाही. तसेच मानधनावर कुठल्या अधिका-यांच्या नियुक्त्या करु नये अशा प्रकारचा कुठलाही शासनाचा जी.आर. नाही आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

एवढीच माहिती हवी होती.

**प्रकरण क्र. ९७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध खात्याचे उपविधी, नियम, विनियम बनविणे कामासाठी देकार मागविणे.

**ठराव क्र. १०६ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ४५४, ४५५ व ४५६ अन्वये उपविधी, नियम, विनियम तयार करणे आवश्यक आहे. याकामी प्रशासनाने प्रस्ताव तयार करुन, मा. स्थायी समिती सभा दि. २४/१२/२००३ विषय क्र. १८७ नुसार मंजुरीसाठी सादर केलेला होता. स्थायी समितीने सदर प्रस्तावावर तत्कालीन उपायुक्त श्री. शिवमुर्ती नाईक यांचेकडे सदरचे उपविधी, नियम, विनियम बनविण्याचे काम सुपूर्त करावे अशा प्रकारचा ठराव पारित केला होता. तथापि, श्री. शिवमुर्ती नाईक (तत्कालीन उपायुक्त) यांनी दि. ०५/०१/२००४ रोजीच्या पत्राने कामाच्या व्यापामुळे सदरचे काम करण्यात असमर्थता दर्शविली होती. तसेच दि. २१/०८/२००४ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेत झालेल्या चर्चेनुसार सदर प्रकरणी स्थायी समिती सभेसमोर विषय घेवून ह्या प्रकरणावर पुढील कार्यवाही करावी असे चर्चेनुसार ठरले होते. त्यानुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध खात्यासाठी नियम, उपविधी व विनियम बनविणेची कायद्यात तरतुद असून सदरचे नियम, उपविधी व विनियम बनविणेकामी तज्ञ व्यक्तिकडून देकार मागविणेंस मा. स्थायी समितीची मान्यता देण्यांत येत आहे. तसेच, सेवानियम तयार होईपर्यंत मनपा आस्थापनेवर कार्यरत असलेले पात्र कर्मचारी यांना तात्पुरता प्रभारी पदभार देण्यांत यावा व यापुढे प्रतिनियुक्तीवर कोणत्याही अधिका-यांची सेवानियम मंजुर होईपर्यंत नेमणुक करण्यांत येऊ नये अथवा मुदतवाढ देण्यांत येऊ नये. कमीत कमी कालावधीत पूर्ण करुन घ्यावे. (३ महिने कालावधी)

**सुचक :- श्रीम. रिटा शाह.** **अनुमोदन :- श्री. अशोक ब. पाटील.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवानी प्रकरण क्र. ९८ चे वाचन केले.)

**अशोक पाटील :-**

जे लघुलेखक आहेत त्यांना नवीन टेंन्डर येईपर्यंत मुदवाढ द्यावी.

**प्रभात पाटील :-**

स्थानिक लोकांना प्राधान्य द्यावे.

**गजानन भोईर :-**

स्थानिक लोक किंवा स्वातंत्र्यसैनिकांचे कोण असेल तर विचारणा करुन त्यांना प्राधान्य द्यावे.

**मा. सभापती :-**

हा जो संगणकाचा जो विषय आलेला आहे या संगणकामध्ये जसा सन्मा. सदस्य गजानन भोईर यांनी प्रश्न मांडलेला आहे की, जर खरोखर स्वातंत्र्यसैनिकांची अशी मुले असतील आणि जर संगणकाचे लघुलेखक असतील तर आपणांला त्यांना कामाला ठेवता येईल.

**प्रभात पाटील :-**

जरा अशी ठरावामध्ये सुचना करा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

स्थानिक घ्या. प्रत्येक वेळेला बाहेरचे बाहेरचे काय?

**सुर्यकांत भोईर :-**

शक्यतो महानगरपालिकेत स्थानिक लोकांना वाव द्या.

**प्रभात पाटील :-**

पर्टीक्युलर स्थानिक शब्द सगळीकडे वापरत चला.

**सुर्यकांत भोईर :-**

बाहेरची लोक येतात आणि स्थानिक लोक इथे भिका मागतात. अशी स्थिती मिरा भाईंदरमध्ये चालली आहे.

**मा. सभापती :-**

स्थानिक या शब्दाची अशी व्याख्या आहे की, माझ्या माहितीप्रमाणे आपण जे स्थानिक बोलतात.

**प्रभात पाटील :-**

मुळचे जे रहिवासी आहेत ते.

**सुर्यकांत भोईर :-**

वडिलोपार्जीत राहणारी जी लोक आहेत ती स्थानिक. म्हणजे आता येऊन बिल्डींगमध्ये फ्लॅट घेऊन राहणारे ते स्थानिक नाही आहेत. मुळचे रहिवासी आणि वडिलोपार्जित राहणारे. शक्यतो आगरी आणि कोळी लोकांना प्राधान्य द्या.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य स्थानिक याची व्याख्या जो पंधरा वर्ष या महाराष्ट्रामध्ये राहतो. त्याला शासनाची भाषा स्थानिक आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, आपल्या मिरा भाईंदरसाठी तुम्ही आगरी, कोळी वापरा. भुमिपूत्रांना मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये वाव द्या. फक्त बाहेरचे येतात. या गावावरुन आलो, त्या गावावरुन आलो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

कायदा कशाला पाहिजे? जो पिढ्यानपिढ्या भाईंदरमध्ये राहतो.

**रिटा शाह :-**

विषय क्र. ९८, सचिव विभागाकरिता ठेका पद्धतीने लघुलेखक पुरवठा करणेकामी मुदतवाढ देणेबाबत. आम्ही मुदवाढ देऊ, परंतु, याच्यामध्ये ॲड करा की, स्थानिक लोकांना प्राधान्य द्या हा ठराव मी मांडत आहे.

**प्रभात पाटील :-**

मुळचे रहिवासी जे आहेत म्हणजे आगरी व कोळी जे आहेत त्यांना प्राधान्य द्या.

**सुर्यकांत भोईर :-**

आगरी व कोळी यांना प्राधान्य द्या.

**रिटा शाह :-**

तसे नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

मुळ रहिवासी, भुमिपुत्रांना प्राधान्य द्या.

**रिटा शाह :-**

फक्त स्थानिक लिहा.

**प्रकरण क्र. ९८ :-**

सचिव विभागाकरिता ठेका पद्धतीने लघुलेखक पुरवठा करणेकामी मुदतवाढ देणेबाबत

**ठराव क्र. १०७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभा, मा. स्थायी समिती सभा व वृक्ष प्राधिकरण समिती, महिला व बालकल्याण समिती तसेच लवकरच प्रभाग समित्या देखील नव्याने स्थापन होऊन कार्यरत होणार आहेत. या सर्व समित्यांच्या सभांचे वेळी सदस्यांनी विषयावर केलेली चर्चा त्यावर दिलेले निर्णय या सर्वांची नोंद लघुलेखकामार्फत घेऊन सभेचे इतिवृत्त तयार करुन संगणकावर संगणक चालकाकडून तयार करण्यांत येते. यासाठी लघुलेखक अत्यंत आवश्यक आहेत. सचिव कार्यालयाने जा.क्र. मनपा/प्र.स./११०/२९५७/०३/०४, दि. १०/०७/२००३ नुसार मे. आदर्श प्रिंटर्स यांना ठेका पद्धतीने लघुलेखक पुरवठा करणेबाबतचा कार्यादेश दिलेला होता. तथापी सदर लघुलेखकांचा पुरवठा करणेबाबत ठेकेदारांची मुदत संपलेली आहे. विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे नविन निविदा मागविण्यांत आलेल्या नाहीत. तरी नविन निविदा मागवून ठेका कायम होईपर्यंत मे. आदर्श प्रिंटर्स या ठेकेदारांस दि. १०/०७/२००४ पासून जुन्याच दराने २ लघुलेखक पुरवठा करणेबाबत व दि. १०/०७/२००४ ते दि. ३१/०७/२००४ पर्यंत महानगरपालिकेस पुरवठा केलेल्या ९ संगणक चालकांचे देयक अदा करणेंस ही मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. अशोक पाटील.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९९ वाचन केले.)

**प्रकरण क्र. ९९ :-**

मा आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १०८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र ७९.४० चौ.किमी आहे. शहरात मोठ्याप्रमाणात कच्ची व पक्की गटारे आहेत. शहरात मोठ्याप्रमाणात अविकसीत जागा असून सदर ठिकाणी पावसाळ्यात पावसाचे पाणी साचून डासांची उत्पत्ती त्यात होत असते. शहरातील बहूसंख्य गटारे उघड्या स्वरुपाची असल्याने सदर गटारात डासांची उत्पत्ती होते पावसाळा व हिवाळ्या दरम्यान साठलेल्या पाण्यात तसेच शहरा लगत असलेल्या खाडी लगतच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर अळी नाशके व किटक नाशके फवारणे करणे कामी खालील प्रमाणे किटक नाशके व अळी नाशके खरेदी करण्याच्या प्रस्तावास मा. स्थायी समिती मंजूरी देत आहे.

| किटक नाशका, अळीनाशकाचे नाव | परिमाण | दर | एकुण किंमत |
|---|---|---|---|
| Fenthion 82.5% EC<br>I.S. No. 7948/1987 | २०० लिटर | रु. १६०५/- प्रती लिटर | रु. ३,२१,०००.०० |
| Propxure 20% E.C. I.S. No 9665/1981 | २०० लिटर | रु. १२२०/- प्रती लिटर | रु. २,४०,४००.०० |
| Chlorpyrifos Mythyl 40% E.C.<br>As per W.H.O Specification | २५० लिटर | रु. १३४७/- प्रती लिटर | रु. ३,३६,६५०.०० |
| Pyrethrum Extract 2% | १५० लिटर | रु. ६३९/- प्रती लिटर | रु. ९५,८५०.०० |

वरील प्रमाणे किटक नाशके खरेदी कामी रु. ९,९७,६००/- खर्च अपेक्षित आहे.

सन २००४-०५ च्या अर्थ संकल्पीय अंदाज पत्रकात किटक नाशके, जंतू नाशके खरेदी या लेखा शिर्षाखाली रु. ८०,००,०००/- तरतूद आहे त्यापैकी रु. ६७,१४,०५७/- तरतूद शिल्लक आहे.

सदरच्या प्रस्तावाचे मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. अशोक ब. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १०० चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १०० :-**

मा आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १०९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालकिच्या शहरातील सार्वजनीक संडास, मुता-या, मच्छी मार्केट, भाजी मार्केट तसेच महानगरपालिकेच्या शाळा, आरोग्य केंद्र आदी मधील शौचालय मुता-या साफ सफाई करीता दुर्गंधी नाशक औषधे व पावडरची आवश्यकता लागत असते. त्याचप्रमाणे आरोग्य विभागा मार्फत किटक नाशक फवारणी करणा या कर्मचा-यांना साबण आवश्यकता असते.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत ७ मच्छी मार्केट व भाजी मार्केट आहेत तसचे महापालिकेच्या २९ शाळा, ५ विभागीय कार्यालये, ७ आरोग्य केंद्र नियमित साफ सफाई करण्या कामी दुर्गंधी नाशके व पावडर खरेदी करण्याच्या प्रस्तावास मा. आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

| दुर्गंधी नाशक, उंदिर नाशकाचे नाव | परिमाण | शिफारस केलेले दर | एकुण किंमत |
|---|---|---|---|
| Black Disinfectant Fluid I.S.I Mark | ७००० लिटर | रु. ४०/- प्रती लिटर | रु. २,८०,०००.०० |
| Acid 10% H.C.L | १००० लिटर | रु. १३.९० प्रती लिटर | रु. १३९००.०० |
| Non Toxic Disinfectant Contain Iodine - 0.3% W/W Aldehyde 3.3% W/W | २००० लिटर | रु. १८४/- प्रती लिटर | रु. ३,६८,०००.०० |
| Germonil Liquid | १००० लिटर | रु. १८९/- प्रती लिटर | रु. १,८९,०००.०० |
| Napthelene Ball | १०० किलो | रु. १२०/- प्रती किलो | रु. १२,०००.०० |
| Life bouy soap | ५०० नग | रु. १२/- प्रती नग | रु. ६०००.०० |
| Carbophenol R.W.C 5% D.P | २००० किलो | रु. १९.९० प्रती किलो | रु. ३९,८००.०० |
| Coumatatralyl 0.0375% I.S No. 9665/1981 | ५०० पॅकेट (प्रती १०० ग्रॅम) | रु. ३०/- प्रती किलो | रु. १५,०००.०० |
| | | **एकुण** | रु. ९,२३,७००.०० |

वरील प्रमाणे किटक नाशके खरेदी कामी रु. ९,२३,७००/- खर्च अपेक्षित आहे.

सन २००४-०५ च्या अर्थ संकल्पीय अंदाज पत्रकात किटक नाशके खरेदी या लेखा शिर्षाखाली रु. ८०,००,०००/- तरतूद आहे त्यापैकी रु. ६७,१४,०५७/- तरतूद शिल्लक आहे.

सदरच्या प्रस्तावाचे मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. अशोक ब. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १०१ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १०१ :-**

मा. आयुक्त सोा. यांनी मंजुरी दिलेल्या प्रकरणाचे अवलोकन करणे. (भांडार विभाग)

**ठराव क्र. ११० :-**

**विषय क्र. १. मा. महापौर, उपमहापौर सर्व सदस्य याच्याकरिता लेटर पॅड, व्हिजिटींग कार्ड, इनव्हलप छपाई करणे.**

महानगरपालिकेने दि. ३१/७/२००४ रोजी दै. सुरज प्रकाश या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार मा. महापौर, मा उपमहापौर सर्व सदस्याचे लेटर पॅड, व्हिजिटींग कार्ड, इनव्हलप छपाई करणे कामी खालील ठेकेदारांनी आपली दरपत्रके सादर केली आहेत.

| अ. क्र. | तपशील | मे. चंडिका प्रिंटर्स | पद्मावती पपेर्स | गिरिष प्रिंटरी |
|---|---|---|---|---|
| १) | लेटर पॅड स्पेशल एक्झिक्युटिव्ह पेपर सा. १/४ स्क्रीन प्रिटिंग चार कलर (मराठी व इंग्रजी) | १४००/-प्र. पाचशे<br>२१००/-प्र. हजारी | १४२५/-प्र. पाचशे<br>२०५०/-प्र. हजारी | १३५०/-प्र. पाचशे<br>१९५०/-प्र. हजारी |
| २) | लेटर पॅड स्पेशल एक्झिक्युटिव्ह पेपर सा. १/८ स्क्रीन प्रिटिंग चार कलर (मराठी व इंग्रजी) | १३००/-प्र. पाचशे<br>१७००/-प्र. हजारी | १२५०/-प्र. पाचशे<br>१६२५/-प्र. हजारी | ११६०/-प्र. पाचशे<br>१५४०/-प्र. हजारी |
| ३) | व्हिजिटींग कार्ड -अमेरिकन साईज स्क्रीन प्रिटिंग चार कलर (मराठी व इंग्रजी) | १३००/-प्र. पाचशे<br>१६००/-प्र. हजारी | १२७५/-प्र. पाचशे<br>१५५०/-प्र. हजारी | ११९०/-प्र. पाचशे<br>१४२५/-प्र. हजारी |
| ४) | इनव्हलप-सुपर फाईन सा. ७ इंच x ४ इंच स्क्रीन प्रिटिंग चार कलर (मराठी व इंग्रजी) | १२५०/-प्र. पाचशे<br>१७००/-प्र. हजारी | १३००/-प्र. पाचशे<br>१६५०/-प्र. हजारी | ११५०/-प्र. पाचशे<br>१५२५/-प्र. हजारी |
| ५) | इनव्हलप-सुपर फाईन सा. ९ इंच x ४ इंच स्क्रीन प्रिटिंग चार कलर (मराठी व इंग्रजी) | १५००/-प्र. पाचशे<br>१८००/-प्र. हजारी | १४६०/-प्र. पाचशे<br>१७२५/-प्र. हजारी | १३५०/-प्र. पाचशे<br>१६५०/-प्र. हजारी |

वरिल तुलनात्मक तक्ता पाहता मे. गिरिष प्रिंटरी यांनी सादर केलेली निविदेतील सर्वात कमी आहेत. सर्वात कमी दराची तुलना बाजार भावाशी केली असता ते वाजवी असल्याने मा. आयुक्त साो. यांनी सदर प्रकरणास मंजुरी दिली आहे. तरी सदरची निविदा स्विकारण्यास व त्या कामी येणारे देयक प्रदान करण्यास मा. स्थायी समितीची मंजुरी मिळणेंस शिफारस असे.

## विषय क्र. २ महानगरपालिकेस फर्निचर पुरवठा करणे.

महानगरपालिकेने **दि. १८/८/२००४** रोजी दै. प्रेस जर्नल (इंग्रजी), दै. सुरज प्रकाश, दै. वृत्तमानस या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदा सूचनेनुसार कार्यालयीन फर्निचर पुरवठा करणेकामी खालीलप्रमाणे ठेकेदारांनी निविदा सादर केल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | निलिमा इन्टरप्रायजेस | ग्लोबल ट्रेडींग | हर्षद इन्टरप्रायजेस |
|---|---|---|---|---|
| १. | स्टील कपाट नामांकित कंपनी साईज ७८' x ३६' x १९' , पाच खण २०-२२ गेज | रु. ६४००/- प्रति नग | रु.५९५०/- प्रति नग | रु. ६४००/- प्रति नग |
| २. | स्टील टेबल नामांकित कंपनी साईज ४८' x २४' x ३०' , एक बाजू तीन ड्रॉवर, सन माईका टॉप, २२ गेज | रु. ३३९०/- प्रति नग | रु. ३३५०/- प्रति नग | रु. ३८००/- प्रति नग |
| ३. | केन खुर्च्या नामांकित कंपनी 'एस' टाईप फुल आर्म ट्युबलर खुर्ची १' डाय १६ गेज पाईप, वुडन सीट व मागील बाजूस नायलॉन जाळी आणि सीट साठी सपेर्टिंग पाईप | रु. ९६०/- प्रति नग | रु. ८५५/- प्रति नग | रु.९२०/- प्रति नग |
| ४. | प्लास्टिक खुर्च्या (निलकमल) नामांकित कंपनी साईज २३' | रु. ४१०/- प्रति नग | रु. ३६५/- प्रति नग | रु. ३८०/- प्रति नग |

| अ.क्र. | तपशिल | निलिमा इन्टरप्रायजेस | ग्लोबल ट्रेडींग | हर्षद इन्टरप्रायजेस |
|---|---|---|---|---|
| ५. | लाकडी बाकडे साईज ५' X १ १/२' | रु. ३१५०/- प्रति नग | रु. २६९०/- प्रति नग | रु. ३१००/- प्रति नग |
| ६. | रिव्हॉलविंग चेअर्स (एक्सीक्युटीव्ह फायबर बॉडी सह) | रु. ४९००/- प्रति नग | रु. ४३९०/- प्रति नग | रु. ४८००/- प्रति नग |
| ७. | स्टील कपाट (लहान साईज) ५०' X ३० X १८' २०-२२ गेज पत्रा ३ सेल्फ | रु. ४८००/- प्रति नग | रु. ४४५०/- प्रति नग | रु. ५८००/- प्रति नग |
| ८. | प्लास्टीक स्टुल (निलकमल) मध्यम साईज | रु. २३०/- प्रति नग | रु. १८०/- प्रति नग | रु. २३०/- प्रति नग |
| ९. | स्टील टेबल साईज ४८' X २४' X ३०' एक बाजूस तीन ड्रॉवर व एक बाजूस बॉक्स टाईप ड्रॉवर स्ट्रक्चर साईज १' X १' | रु. ५३००/- प्रति नग | रु. ४८५०/- प्रति नग | रु. ५२००/- प्रति नग |
| १०. | कॉम्प्युटर चेअर्स पी. व्ही. सी. हॅन्डल व व्हील सह | रु. ३३००/- प्रति नग | रु. २७५०/- प्रति नग | रु. ३१००/- प्रति नग |
| ११. | हायड्रोलिक सिस्टिम चेअर्स | रु. १२५००/- प्रति नग | रु. ९७५०/- प्रति नग | रु. १२५००/- प्रति नग |
| १२. | लोखंडी स्टुल मध्यम साईज (चांगला प्रतिचा) | ------------ | रु. ३३०/- प्रति नग | रु. ३९०/- प्रति नग |

वरिल तुलनात्मक तक्ता पाहता मे. ग्लोबल ट्रेडींग कं. यांनी सादर केलेली निविदेतील सर्वात कमी आहेत. सर्वात कमी दराची तुलना बाजार भावाशी केली असता ते वाजवी असल्याने मा. आयुक्त सो. यांनी सदर प्रकरणास मंजुरी दिली आहे. तरी सदरची निविदा स्विकारण्यास व त्या कामी येणारे देयक प्रदान करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ७ खंड(ड) नुसार वरिल प्रकरणी मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सुचक :- श्री. अशोक पाटील.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०१.०५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**